। लातूर । वर्ष ३५ वे । अंक ९३ वा । शुक्रवार, दिनांक २६ जून २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# ऑपरेशन सिंदूर मध्ये शहीद झालेल्या सहा जवानांची नावे पहिल्यांदाच जाहीर




**नवी दिल्ली/वृत्तसेवा:** जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्याला लष्करी प्रत्युत्तर म्हणून राबवण्यात आलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान शहीद झालेल्या सहा लष्करी जवानांची नावे भारत सरकारने प्रथमच जाहीर केली आहेत. २२ एप्रिल रोजी पहलगाममधील बैसरन खोऱ्यात दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात २५ पर्यटक आणि एका स्थानिक घोडावाल्यासह २६ जण ठार झाले. यानंतर भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले, यात शहीद झालेल्या सहा जवानांची नावे भारताने पहिल्यांदाच सार्वजनिक केली आहेत.

'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान शहीद झालेल्या सहा जवानांमध्ये भारतीय लष्कराचे पाच जवान आणि भारतीय हवाई दलातील एका सार्जंटचा समावेश आहे.

**कोण आहेत शहीद झालेले सहा जवान?**

१. सुभेदार मेजर पवन कुमार – मुख्यालय, १० इन्फंट्री ब्रिगेड
२. रायफलमन सुनील कुमार – ४ थी बटालियन जम्मू आणि काश्मीर लाइट इन्फंट्री रेजिमेंट
३. लान्स नाईक दिनेश कुमार – ५ वी फील्ड रेजिमेंट
४. अग्निवीर मूड मुरली नायक – ८५१ वी लाइट रेजिमेंट
५. हवालदार सुनील कुमार सिंग – २३७ वी फील्ड वर्कशॉप
६. सार्जंट सुरेंद्र कुमार – ३९ विंग, भारतीय हवाई दल

**राष्ट्रीय युद्ध स्मारकावर कोरली जाणार शहीद जवानांची नावे**

रायफलमन सुनील कुमार यांना मरणोत्तर वीर चक्र प्रदान करण्यात आले, तर सार्जंट सुरेंद्र कुमार यांना वायू पदकाने सन्मानित करण्यात आले. ऑपरेशन सिंदूरमध्ये शहीद झालेल्या सहा जवानांची नावे नवी दिल्लीतील इंडिया गेट सर्कल येथील राष्ट्रीय युद्ध स्मारकात विशेष ग्रॅनाइट फलकांवर कायमस्वरूपी कोरली जातील.

**ऑपरेशन सिंदूर**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर भारतीय सशस्त्र दलांनी ७ मे २०२५ च्या पहाटेच्या सुमारास दहशतवादी हल्ल्याला थेट प्रत्युत्तर म्हणून 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. यामध्ये पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये शंभरहून अधिक दहशतवादी ठार झाले आणि त्यांचे तळ उद्ध्वस्त झाले. तीन दिवस झालेल्या चकमकीनंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात १० मे रोजी शस्त्रसंधी झाली.




# लातूरमध्ये सामाजिक न्याय दिनानिमित्त आयोजित

## समता दिंडी, संविधान जनजागृती प्रभात फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/(जिमाका): राजर्षि छत्रपती शाहू महाराज जयंती, सामाजिक न्याय दिनानिमित्त लातूर येथे समाज कल्याण विभागामार्फत समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला लातूर शहरातील नागरिक, विद्यार्थी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच हिरवी झेंडी दाखवून या प्रभात फेरीला सुरुवात करण्यात आली.**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, सहायक आयुक्त यादव गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर ढमाले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी सदैव दक्ष होते आणि समाजातील दुर्लक्षित, मागासवर्गीय, दिव्यांग, वृद्ध, निराधार व दुर्बल घटकांच्या प्रती त्यांचा दृष्टिकोन विशेष सहानुभूतीचा व सुधारणावादी होता. त्यांनी या घटकांच्या कल्याणार्थ अनेक निर्णय अंमलात आणले. राजर्षी शाहू महाराजांचा हाच आदर्श समाजापुढे यावा या दृष्टिकोनातून त्यांचा जन्मदिवस २६ जून हा प्रतिवर्षी 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

सामाजिक न्याय दिनानिमित्त आयोजित समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीच्या सुरुवातीला भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. त्यानंतर प्रभातफेरीला सुरुवात झाली. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा–गंजगोलाई–महात्मा गांधी चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे आल्यानंतर या प्रभातफेरीचा समारोप करण्यात आला.

या समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये याबाबात जनजागृती करण्याच्या दृष्टीने संविधानातील कायद्यासमोर समानता, भेदभाव प्रतिबंध, अस्पृश्यता प्रतिबंध, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे अधिकार व कर्तव्ये या विविध अनुच्छेदांची तसेच अस्पृश्यता निर्मूलनाची माहिती असलेल्या घोषणावाक्यांचे फलक हाती घेवून जनजागृती केली. लातूर शहरातील ज्ञानेश्वर विद्यालय, यशवंत विद्यालय, देशिकेंद्र विद्यालय, राजमाता जिजामाता माध्यमिक विद्यालय, राजस्थान माध्यमिक विद्यालय, परिमल माध्यमिक विद्यालय आणि व्यंकटेश माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी–विद्यार्थिनी यांनी या समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीमध्ये सहभाग घेतला.

# व्यावसायिक गॅसवरील निर्बंध हटवले: हॉटेल, उद्योग क्षेत्राला मोठा दिलासा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियात (मिडल ईस्ट) निर्माण झालेल्या संकटामुळे व्यावसायिक एलपीजीच्या (कमर्शियल एलपी–ीजी) पुरवठ्यावर लादण्यात आलेले सर्व क्षेत्रनिहाय निर्बंध केंद्र सरकारने हटवले आहेत. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पाठवलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे की, आता बिगर घरगुती पॅक्ड एलपीजीचा (व्यावसायिक सिलिंडर) पुरवठा संकटापूर्वीच्या पातळीवर पूर्ववत केला जाईल. सरकारच्या या निर्णयामुळे हॉटेल, रेस्टॉरंट, केटरिंग, छोटे उद्योग आणि अन्य व्यावसायिक ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे.




मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी याबाबत एक पत्र जारी केले आहे. त्यानुसार, पश्चिम आशियातील तणावामुळे गॅस पुरवठा विस्कळीत झाला होता. अशा स्थितीत घरगुती ग्राहकांना विनाअडथळा एलप–ीजी उपलब्ध करून देण्यासाठी कमर्शियल पॅक्ड एलपीजीचा पुरवठा मर्यादित करण्यात आला होता. आता परिस्थिती पूर्वपदावर आल्यानंतर हे निर्बंध पूर्णपणे उठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारने 'बल्क एलपीजी'च्या (मोठ्या प्रमाणावरील) पुरवठ्यावरील निर्बंधांमध्येही शिथिलता दिली आहे. पूर्वी लागू केलेले निर्बंध ५० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले आहेत, ज्यामुळे मोठ्या औद्योगिक आणि संस्थात्मक ग्राहकांनाही मोठा दिलासा मिळेल.

रोज वाचा ऑनलाईन लातूर समाचार www. latursamachar. com

## प्रभात किरणे

नसाव जगण कंजूष
नसाव बोलण कंजूष
नसाव वागण कंजूष
असाव नेहमीच खुश

–इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



एफडीए ९६४ धाडी ३४.६६ कोटीचा मुद्देमाल जप्त...

## चिमटा दयाचा



राज्यात मोठ्या प्रमाणात
भेसळ होते हे यापुर्वीच्या
अधिकाऱ्यास कसे
दिसले नाही!
मोतीबिंदुचा असर असल्याने
भेसळ दिसले नाही!!
बाकीचे दिसते, भेसळ दिसत
नाही, हीच डोळयाची कमाल
आहे, दोषाची नाही!!!

# शहरातील खाजगी क्लासेससह सर्व इमारतींचे तात्काळ फायर ऑडिट करा

## स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांचे अग्निशामक विभागास निर्देश




**लातूर/प्रतिनिधी:** उत्तरप्रदेश मधील लखनऊ येथील इमारतीला आग लागुन झालेल्या दुर्घटनेत १५ निश्पाप विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला आहे. या पार्श्वभूमीवर लातूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तात्काळ सर्तक होऊन शहरातील खाजगी क्लासेस, महाविद्यालय, हॉस्टेल्स व्यवसायीक व रहिवाशी इमारतींचे तात्काळ फायर ऑडिट करावे असे निर्देश देऊन या सर्व इमारतीमध्ये विहीत वेळेत अग्निशमन सुरक्षा यंत्रणा बसविण्यात येण्यासाठी ठोस पाऊले उचलावित अशी सुचना स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी दिल्या आहेत.


माजी पालकमंत्री आमदार अमित देशमुख यांच्या सुचने नुसार स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी अग्निशमन विभागाची बैठक घेऊन आढावा घेतला. लातूर शिक्षणाची पंढरी असुन शहरातील विविध भागांमध्ये विद्यालय, महाविद्यालय यासह हॉस्टेलच्या अनेक इमारती आहेत. याठिकाणी शहरासह जिल्हा व परजिल्ह्यातील आणि वेगवेगळ्या राज्यातील हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आगीसारख्या दुर्घटनेमुळे विद्यार्थ्यांना जीव गवमावा लागणार नाही याची दक्षता महानगर पालिकेच्या अग्निशमन विभागाने घेणे गरजेचे असल्याचे सभापती सचिन बंडापल्ले यांनी स्पष्ट केले. केवळ शैक्षणीक संकुलामध्ये विद्यार्थी व शिक्षक यांचेच प्राण नव्हे तर व्यावसायिक व रहिवाशी इमारतीतील नागरिकांचे प्राण ही तितकेच मोलाचे असल्याचे सभापती बंडापल्ले यांनी निदर्शनास आणून दिले.

सभापती सचिन बंडापल्ले यांनी अग्निशमन विभागाला स्पष्ट निर्देश देताना सांगितले की, या सर्व इमारतीचे तात्काळ फायर ऑडिट होणे आवश्यक आहे. याकरीता अग्निशमन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लगेचच हि मोहीम हाती घ्यावी. ज्या इमारती मध्ये अग्निशामक सुरक्षा यंत्रणा योग्य आहे त्या इमारतींना प्रमाणपत्र देण्यात यावे आणि ज्या इमारतींमध्ये ही यंत्रणा नादूरुस्त अथवा उपलब्ध नाही त्यांना ठराविक मुदत देऊन नोटीस देण्यात यावी अशी सुचना केली. केवळ एवढ्यावरच न थांबता ठराविक मुदत संपल्या नंतर पुन्हा त्या इमारतींचे ऑडिट करुन आग्निशामक सुरक्षा यंत्रणा सक्षम आहेत का नाही याची शहानिशा करावी असे सांगुन या सर्व बाबींचा आढावा आगामी काही दिवसात देण्यात यावा असे निर्देश स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी दिले आहेत. त्याच बरोबर आगीच्या दुर्घटनेतून कशा पध्दतीने बचाव करावा याबाबतची जनजागृती ही विभागाच्या वतीने करण्यात यावी अशी सुचना दिली आहे.यावेळी अग्नीशामक सुरक्षा प्रमुख गणेश चौधरी, बापूसाहेब जाधव यांच्यासह विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# तलवारीचा व्हिडिओ व्हायरल; एकावर गुन्हा दाखल

**उदगीर/प्रतिनिधी:** समाजमाध्यमावर तलवार प्रदर्शित करत व्हिडिओ व्हायरल करून समाजात दहशत व भीतीचे वातावरण निर्माण केल्याप्रकरणी उदगीर शहर पोलिसांनी एका १८ वर्षीय तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी सांगितलेली माहिती अशी की, अर्जुन विक्रम चव्हाण (रा. इच्छापूर्ती हनुमान मंदिराजवळ, नांदेड रोड, उदगीर) याने मंगळवारी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास जय जवान चौक ते रेमंड शोरूमकडे जाणाऱ्या रस्त्यावर लोखंडी मूठ असलेली, एका बाजूने धार असलेली सुमारे ५१ सेंमी लांबीची तलवार दुचाकीवर ठेवून त्याचा व्हिडिओ तयार केला. तो सोशल मीडियावर व्हायरल केला. त्यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी पोलीस कर्मचारी संजीव मुंढे यांच्या तक्रारीवरून गुरुवारी सदर तरुणाविरुद्ध उदगीर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तलवार जप्त केली आहे. पुढील तपास पोहेकॉ. हारणे करीत आहेत.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## राजर्षी शाहू महाराज यांचे मोठे उपकार

राजर्षी शाहू महाराज यांना भारतच काय परदेशात किर्ती आहे. कोल्हापूरचे राजे होते. ते राजे कधी वाटत नव्हते, कारण त्याचे कार्य सर्वांनी अंगीकारण्यारखे होते. समानते बरोबर, न्यायादाते होते. प्रत्येक नेता, राजकारणी शाहु, फुले व आंबेडकरांचे नाव घेतल्याशिवाय भाषणाची सुरवात करीत नाही. राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य उपेक्षितांसाठी मोठे होते.गोरगरीब, दीनदलितांसाठी घेलेले निर्णय त्या काळात धाडसाचे होते. त्यांची जी राजकिय कार्यकिर्द पाहीली तर राज्यात अशिक्षितांचे प्रमाण अल्प होते. ठराविक समाज हा शिकलेला, सुरक्षित होता. त्यांचे समाजावर वर्चस्व होते. वर्चस्व असले तरी योग्य वागणुक त्यांच्याकडून मिळत नव्हती. शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी संदर्भ हवा त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेले वेदोक्त प्रकरण शाहू महाराजांच्याच काळात झाले. 'शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल', शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी, तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठीही सहकार्य केले होते. त्यांनी चित्रकार आबालाल रहिमान यांच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. स्वातंत्र्यापूर्वी कैक वर्षे आधी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात 'महाराजांचे महाराज' असा गौरव होतो. रयत प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य शाहूंनी केले आपल्या संपूर्ण जीवन कार्यामध्ये त्यांनी समाजातील बहुजन समाजाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर केला म्हणूनच ते लोककल्याणकारी राज्यकर्ते ठरले. त्यांच्या कार्याचा गौरव समकालीन लेखकांनी व इतिहासकारांनी केलेला आहे. महाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती. म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. तसेच ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळा काढल्या. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू. दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली. अस्पृश्यांना शिवण यंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्य वस्तीत चहाचे दुकान काढून दिले अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना पैलवान चांभार यांना सरदार अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे चालवणारा राजा म्हणून आपली ओळख निर्माण केली. सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा व आरोग्य इत्यादी महत्त्वपूर्ण क्षेत्रामध्ये अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे. हा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली व तिची त्वरित अंमलबजावणी करून संबंधत अधिकाऱ्याकडून अहवाल मागविले. शाहूंच्या या निर्णयाला तेंव्हा अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी विरोध केला. त्या काळात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांसाठी नोकरीमध्ये राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी (तत्कालीन) अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. त्याकाळी धर्माच्या नावाखाली देवांना मुले-मुली वाहण्याची विचित्र पद्धत भारतात चालू होती. परंतु राजांनी आपल्या संस्थानात जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा करून ही पद्धत बंद पाडली. जातिभेदाचे प्रस्थ नष्ट व्हावे म्हणून आपल्या संस्थानात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशर मान्यता दिली. तसा कायदा पारित केला आणि याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना आपल्या चूलत बहीणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. एवढेच नव्हे तर संस्थानात जवळजवळ १०० मराठा-धनगर विवाह घडवून आणले. अशा अनेक कार्यांच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांना सन्मानाची वागणूक व दर्जा मिळवून दिला. शाहू महाराजांचे मोठे उपकार सर्व जनतेवर आहेत.

# वसतिगृहाच्या चळवळीतून सामाजिक सुधारणा करणारे


# राजर्षी छत्रपती शाहू महाराज

भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासात अनेक महापुरुषांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी 'शिक्षण हेच मुक्तीचे शस्त्र' मानले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मूलमंत्र दिला. जागतिक स्तरावरही अमेरिकेचे शिक्षणतज्ज्ञ जॉन ड्युई, दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रध्यक्ष नेल्सन मंडेला आणि इतर अनेक विचारवंतांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचा पाया मानले. मात्र शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली करण्यासाठी केवळ शाळा उभारणे पुरेसे नसते; विद्यार्थ्यांना राहण्याची, जेवणाची, अभ्यासाची आणि सुरक्षित वातावरणाचीही गरज असते. ही गरज ओळखून वसतिगृहांच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची व्यापक चळवळ उभारणारे भारतातील अग्रगण्य समाजसुधारक म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज.

२६ जून १८७४ रोजी जन्मलेल्या यशवंतराव घाटगे यांना पुढे कोल्हापूरच्या राजघराण्यात दत्तक घेण्यात आले. पुढे ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणून इतिहासात अजरामर झाले. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांनी करवीर संस्थानची राज्यसूत्रे स्वीकारली. ६ मे १९२२ ला त्यांचे निधन झाले. अवघ्या ४८ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि प्रशासकीय क्षेत्रात इतके क्रांतिकारी कार्य केले की, त्यांना आधुनिक भारताच्या सामाजिक क्रांतीचे शिल्पकार म्हणून गौरविले जाते.

बहुजन समाजाला अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी राजर्षी शाहूंनी अनेक चळवळी उभी केल्या त्यातील



सर्वाधिक प्रभावी चळवळ ही वसतिगृहांची चळवळ ठरली आहे. राज्याच्या कोषातून, राजाच्या उपयोगाच्या, मंदिराच्या डागडुजीच्या पैशाला त्यांनी वसतीगृहासाठी वळते केले. काहींना वार्षिक मदत, काहींना इमारती, काहींना जमीनी देऊन स्वत: उभे राहून त्यांनी वसतिगृहे उभारली.

शाहू महाराजांच्या विचारांवर महात्मा ज्योतिराव फुले, यांच्या सत्यशोधक चळवळीचा मोठा प्रभाव होता. बहुजन समाजाचे उत्थान शिक्षणातूनच होऊ शकते, हा फुले यांचा विचार शाहू महाराजांनी प्रत्यक्ष प्रशासनात उतरविला. एका शतकानंतरही आजही त्यांच्या वसतिगृहांमधून अनेकांचे आयुष्य घडत असून त्यांनी सुरू केलेली ही चळवळ जवळपास १२५ वर्षानंतरही अजूनही सक्षमपणे विद्यार्थी घडविण्याचे काम करीत आहे. कोल्हापुरात विविध ठिकाणी उभे असणारे हे वसतीगृह छत्रपती शाहू महाराजांच्या दूरदृष्टीची कल्पना देणारे ठरतात.

सुरुवातीला सर्व जाती-धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी एकत्रित वसतिगृहाचा प्रयोग करण्यात आला. राजाराम वसतिगृह हा त्याचा प्रारंभिक प्रयत्न मानला जातो. मात्र प्रत्यक्षात सामाजिक विषमता आणि जातीय पूर्वग्रहांमुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अपेक्षित वातावरण मिळत नव्हते. काही ठिकाणी प्रवेशाचे धोरण सर्वांसाठी खुले असले तरी प्रत्यक्ष लाभ काही मोजक्या घटकांनाच मिळत असल्याचे शाहू महाराजांच्या निदर्शनास आले. या अनुभवातून त्यांनी स्वतंत्र समाजनिहाय वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेतला. जातीव्यवस्थेचा पगडा समाजावरून जात नसल्यामुळे शाहू महाराजांनी काढलेला हा उपाय बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रभावी ठरला. या वसतिगृहांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी संबंधित समाजातील सुशिक्षित आणि विश्वासार्ह व्यक्तींवर सोपविण्यात आली. त्यामुळे समाजातील नेतृत्व विकसित झाले आणि शिक्षणाची चळवळ लोकचळवळ बनली. सामाजिक परंपरा, चातुर्वर्ण्याचा प्रभाव त्यामुळे पुढे त्यांनी बहुजन विद्यार्थ्यांना वेगळी वसतीगृहे काढून जातीच्या उतरंडीच्या जोखडातून मुक्त केले.

कोल्हापूर संस्थांमध्ये १८९६-९७ ला दुष्काळ पडला. ग्रामीण भागातून मुले शिक्षणासाठी येणे बंद झाले. राहणे, खानावळ, कपडालत्ता सर्वच गरीबांना परवडणे शक्य नव्हते. ही बाब शाहू महाराजांच्या लक्षात आली याशिवाय लंडन दौऱ्यामध्ये तेथील शिक्षण पद्धतीचा अभ्यास केल्यावर त्यांना वसतिगृह ही कल्पना नावीन्यपूर्ण व परिवर्तनाची वाटली. १९०१ पासून कोल्हापूरमध्ये वसतिगृह उभारणीची व्यापक चळवळ सुरू झाली. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, जैन बोर्डिंग, मुस्लिम बोर्डिंग, वीरशैव लिंगायत बोर्डिंग, नामदेव बोर्डिंग, दैवज्ञ बोर्डिंग, सारस्वत बोर्डिंग, कोष्टी, आर्य समाज गुरुकुल, वैश्य बोर्डिंग, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग, ढोर- चांभार समाजासाठी इंदुमती राणीसाहेब वसतीगृह, अनुसुचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी अर्थात अस्पृशांसाठी 'मिस क्लार्क' वसतिगृह उभारण्यात आली. संशोधनपर नोंदींनुसार शाहू महाराजांनी सुमारे २० ते २२ वसतिगृहांचे जाळे उभे केले होते.

शाहू महाराजांच्या वसतिगृह चळवळीतील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९०८ मध्ये सुरू झालेले 'मिस क्लार्क वसतिगृह'. हे वसतिगृह अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आले होते. हजारो वर्षे ज्यांना शिक्षणापासून वंचित ठेवल्या गेले. त्या अस्पृश्य समाजाला शिक्षणाची दारे सताड उघडणारा हा क्रांतिकारी निर्णय होता. तत्कालिन व्यवस्थेत या निर्णयाची चर्चा देशभर झाली. शाहू महाराजांची ही दूरदृष्टी आणि या निर्णयाची गरज काय होती हे त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विदेशात शिक्षणासाठी १९२० मध्ये त्यांनी केलेल्या मदतीतून स्पष्ट होते. राजर्षी शाहू महाराजांची मागासवर्गीयांबाबतची कणव यातून स्पष्ट होते. १९०८ मध्ये स्थापन झालेले मिस क्लार्क वसतिगृह हे भारतातील दलित विद्यार्थ्यांसाठीच्या सर्वात महत्त्वाच्या शैक्षणिक उपक्रमांपैकी एक होते. गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांच्या कन्या मिस व्हायोलेट क्लार्क यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी देणगी व जनजागृतीचे कार्य केले. त्यांच्या योगदानाचा गौरव म्हणून शाहू महाराजांनी त्यांच्या नावाने वसतिगृह सुरू केले. हे वसतिगृह दलित शिक्षणाच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरले. शाहू महाराजांनी या वसतिगृहासाठी स्वतंत्र इमारत, खेळाचे मैदान आणि आर्थिक अनुदान उपलब्ध करून दिले.

वसतिगृह ही केवळ निवासाची व्यवस्था नव्हती. तेथे निवास, भोजन, अभ्यासासाठी जागा, शिष्यवृत्ती, ग्रंथालय, शिस्तबद्ध वातावरण आणि सामाजिक जाणीव यांची सांगड घालण्यात आली होती. ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना शहरातील शिक्षणाशी जुळवून घेण्यासाठी हे केंद्र महत्त्वाचे ठरले. आजही हे वसतीगृह सुरू असून या ठिकाणी माजी विद्यार्थ्यांकडून सुंदर इमारत उभारली आहे.

मुस्लिम विद्यार्थ्यांसाठीही त्यांनी याच काळात वसतीगृह उभारले. हे वसतिगृह आजही सुरू असून सर्व समाजातील विद्यार्थी या ठिकाणी प्रवेश घेतात. शाहू




महाराजांनी ठरवून दिल्याप्रमाणे मुस्लिम ट्रस्टद्वारे हे वसतिगृह आजही कार्यरत असून विविध मान्यवरांनी भेटी दिल्या आहेत. महाराष्ट्रात अशा पद्धतीच्या वसतिगृहांची रचना कुठेच दिसून येत नाही. विशेष म्हणजे शंभर वर्षानंतरही हे वसतिगृह अजूनही विद्यार्थ्यांना अल्पदरामध्ये राहण्याची, जेवणाची, निवाऱ्याची, व्यवस्था करून देते.अनेक पिढ्यांना घडविण्याचे काम या दगडी कोरीव इमारतीतून झाले असून कोल्हापूरचा फेरफटका मारल्यानंतर या वास्तू आजही लक्ष वेधून घेतात.

शाहू महाराजांनी शिक्षण आणि रोजगार यांचा परस्परसंबंध ओळखला होता. शिक्षण घेतलेल्या मागासवर्गीय युवकांना नोकरीची संधी मिळाली नाही तर त्यांचा शिक्षणावरील विश्वास कमी होईल, हे त्यांनी ओळखले. त्यामुळे २६ जुलै १९०२ रोजी त्यांनी संस्थानातील सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर केले. भारतातील आरक्षणाच्या इतिहासातील हा एक मैलाचा दगड मानला जातो. शिक्षण, वसतिगृहे आणि आरक्षण या त्रिसूत्रीमुळे बहुजन समाजात नवे नेतृत्व निर्माण झाले.

शाहू महाराजांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. १९१७ मध्ये त्यांनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला. सात ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना शाळेत पाठविणे पालकांसाठी बंधनकारक करण्यात आले. मुलांना शाळेत न पाठविणाऱ्या पालकांवर दंड



आकारण्याची तरतूदही करण्यात आली होती. काही नोंदींनुसार विलंब करणाऱ्या पालकांकडून दरमहा एक रुपया दंड आकारला जात असे. स्वतःच्या दरबार खजिन्यातून आणि देवस्थान फंडातून पैसे वळते करून शिक्षणाला महत्त्व देणारा हा राजा म्हणूनच सामाजिक क्रांतीचा जनक मानला जातो.

या योजनेसाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून शाहू महाराजांनी विशेष शिक्षण कर लागू केला. डॉक्टर, वकील, सावकार, अधिकारी आणि विशिष्ट उत्पन्न गटातील घटकांकडून शिक्षण उपकर आकारण्यात येत असे. शिक्षणासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्याचा हा दूरदृष्टीचा निर्णय होता.

शाहू महाराजांच्या कार्यकाळात कोल्हापूरला 'शिक्षणाची काशी' म्हणून ओळख मिळाली. १९१७ मध्ये संस्थानात केवळ २७ शाळा आणि सुमारे १,३०० विद्यार्थी होते. मात्र १९२२ मध्ये त्यांच्या निधनाच्या वेळी शाळांची संख्या ४२० पर्यंत आणि विद्यार्थ्यांची संख्या २२ हजारांहून अधिक झाली होती. शिक्षणाचा हा विस्तार अभूतपूर्व मानला जातो.

शाहू महाराजांनी कोल्हापूरला 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस' असे संबोधले होते. महाराष्ट्रभर उभारल्या गेलेल्या वसतिगृहांच्या चळवळीमागे त्यांचीच प्रेरणा होती. त्यांनी उभारलेल्या या वसतीगृहाचा लाभ, या वसतिगृहांमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व करणाऱ्या विविध क्षेत्रात नाव कमावणाऱ्या अनेकांनी घेतला आहे.

आज महाराष्ट्र शासन समाजकल्याण, इतर मागास बहुजन कल्याण, आदिवासी विकास, सामाजिक न्याय, भटक्या-विमुक्त कल्याण तसेच मराठा समाजासाठी उभारण्यात येणाऱ्या विविध वसतिगृहांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निवास, भोजन, शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देत आहे. या सर्व योजनांच्या पायाशी शाहू महाराजांनी मांडलेली 'शिक्षण सर्वांसाठी' हीच मूलभूत संकल्पना असल्याचे स्पष्ट दिसते. वसतिगृह केवळ विद्यार्थी घडवत नाही तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देते राज्य शासनाने वसतिगृहाचे महत्त्व लक्षात घेऊन विविध खात्यामार्फत हजारो वसतिगृहांची, आश्रमशाळांची उभारणी केली आहे. या सुविधांमधून तयार झालेली एक पिढी राज्याचे विविध क्षेत्रात नेतृत्व करत आहेत.

राजर्षी शाहू महाराजांचे संपूर्ण कार्य पाहिले तर त्यांनी शिक्षणाला केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन मानले नाही, तर सामाजिक न्याय, समता आणि स्वाभिमानाचे माध्यम मानले. ब्रिटिश भारतामध्ये अन्य राज्यांमध्ये शिक्षणावर जितका खर्च होत नव्हता तितका खर्च कोल्हापूर सारख्या एका छोट्या संस्थांमध्ये महाराजांच्या दूरदृष्टीमुळे व शैक्षणिक महत्त्व त्यांना पटल्यामुळे होत होता. शैक्षणिक आघाड्यांवर महाराष्ट्रामध्ये पुढे मोठ मोठ्या संस्था उभ्या झाल्या, विद्यापीठे उघडल्या गेली, या सर्वांची प्रेरणा छत्रपती शाहू महाराज होते. शाहू महाराजांनी उभी केलेली ही वसतिगृहे आजही ताठ मानेने सुरु आहेत. आता जातीची बंधणे राहिली नाही. सर्व वसतिगृहात सर्व जाती-पातीची मुले शिक्षण घेत आहेत. मात्र गरजू , गरीब आणि प्रज्ञावान मुलांसाठी आजही ही वसतिगृहे सामाजिक, आर्थिक परिवर्तनाची व मानसिक बलस्थानाची केंद्रे आहेत.

वसतिगृह चळवळीच्या माध्यमातून त्यांनी शिक्षणाची दारे बहुजन समाजासाठी खुली केली. शिक्षण, आरक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृहे आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण या उपाययोजनांद्वारे त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा एक नवा अध्याय लिहिला. म्हणूनच शाहू महाराजांना शिक्षणातून समाज परिवर्तन घडविणारे युगपुरुष म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. त्यांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. समाजाच्या प्रगतीचा खरा मार्ग शिक्षणातूनच जातो.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**
९७०२८५८७७७

## दुर्घटनेची पुनरावृत्ती

शहरांत जमिनीची कमतरता असल्याने मिळेल त्या जागेत बांधकामे उभी राहतात. आग किंवा अन्य धोक्यांपासून त्या इमारती सुरक्षित आहेत का हे कोणीच पाहात नाही. अनेक बळी गेल्यावर प्रशासन जागे होते. लखनौमधील एका इमारतीत आग लागली. त्यात किमान १५ जण मृत्युमुखी पडले. त्यात १६ ते २५ वर्षे वयाच्या तरुणांचा समावेश आहे. ही घटना करुणाजनक आहे तशीच संतापजनकही आहे. या इमारतीत ॲनिमेशनची कला शिकवणारा कोचिंग क्लास होता. त्या इमारतीत आग लागली आणि ती झपाट्याने पसरली. अनेक मुले-मुली त्यात अडकली. त्यांच्यापैकी काही जणांनी आपल्या पालकांशी मोबाईल वरून संपर्क साधला, ते तेथे पोचलेही; पण आग भडकली होती आणि कोणी काही करू शकले नाही. अनेक पालकांना आपल्या मुलाचे किंवा मुलीचे कलेवर बघावे लागले. या घटनेच्या वृत्ताचे तपशील हृदयद्रावक आहेत तसेच व्यवस्थेवर प्रश्न निर्माण करणारे आहेत. उत्तर प्रदेश सरकारने या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले. मृतांच्या नातलगांना व जखमींना आर्थिक मदत जाहीर झाली. ही सरकारी पद्धत आहे. ही



अशा क्लासमध्ये पाठवतात. त्या वेळी, त्या इमारतीस अग्निशामक दलाचे ना हरकत प्रमाण पत्र मिळाले आहे का? ती सुरक्षित आहे का? याची चौकशी कोणी करत नाही. त्या इमारतीत आग लागेल हे कोणाच्या मनातही येत नाही. ती खबरदारी स्थानिक प्रशासनाने घेणे अपेक्षित असते. नव्हे, ती त्यांचीच जबाबदारी आहे. बांधकाम कंत्राटदार, त्या इमारतीतील व्यावसायिक यांच्याशी 'अर्थपूर्ण' व्यवहार करण्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकार्यांना जास्त रस असतो हे देशभरातील उघड गुपित आहे. या इमारतीची सुरक्षितता तपासण्याचे काम लखनौ विकास प्राधिकरण, अग्निशामक दल आणि वीज पुरवठा संस्था यांनी करायला हवे होते, पण ते झालेले नाही हे या दुर्घटनेने स्पष्ट

दुर्घटना टाळता आली असती का? हा प्रश्न महत्त्वाचा आहे आणि तो सर्व राज्यांना लागू होतो. लखनौ मधील दुर्घटनेनंतर राज्यातील कोचिंग क्लासच्या सुरक्षिततेची पाहणी सुरु झाली आणि सुमारे ४८ क्लास 'सील'करण्यात आल्याचे सरकारने सांगितले आहे. मात्र लखनौमध्ये घडलेल्या दुर्घटनेबद्दल कोणास जबादार धरण्यात आले का? त्यांच्यावर काय कारवाई झाली?

**अक्षम्य दुर्लक्ष**


दिल्ली मध्ये एका हॉटेलला आग लागली, बिहारमध्ये एका रुग्णालयात आग लागली; या घटना याच महिन्यात घडल्या. दोन्ही घटनांत अनेक जण मरण पावले.त्या नंतर 'फायर ऑडिट'चे आदेश दिले गेले. तसेच आताही दिले गेले. ही एक प्रशासकीय प्रथा आहे. आग लागू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपायांचा विचार होत नाही. लखनौमधील ज्या इमारतीत आग लागली. ती तीन मजली आहे. तेथे आत प्रवेश करण्यास व बाहेर पडण्यास एकच जिना आहे तोही चिंचोळा आहे. संकट काळात बाहेर पडण्यास दुसरा मार्ग नाही. वायु विजनाची पुरेशी व्यवस्था नाही. अशी इमारत बांधण्यास परवानगी कशी दिली गेली? कोणी ती दिली? दुर्घटनेत अनेक बळी गेल्यानंतर काही अधिकार्यांना निलंबित करणे, इमारतीच्या मालकास अटक करणे हे सोपस्कार पार पडले. त्याने मृत युवक परत येणार नाहीत. आपल्या मुलाचे/मुलीचे भविष्य उज्ज्वल व्हावे या हेतूने पालक त्यांना शिक्षणासाठी

केले. भारतीय मानक संस्थेचे (ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्डस) राष्ट्रीय बांधकाम नियम सुमारे १० वर्षांपूर्वी जाहीर झाले. सर्व राज्यांनी त्यांच्या बांधकाम नियमांत ते समाविष्टही केले आहेत. मात्र त्यांच्या अंमलबजावणीकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे आगीच्या दुर्घटनांवरून जाणवते. शिक्षण व रोजगारासाठी शहरांमध्ये गर्दी वाढत आहे.

त्यांना राहण्यासाठी किंवा क्लाससाठी जागा देऊन पैसे कमावण्याचा जागा मालकांचा हेतु असतो. ते सुरक्षिततेच्या नियमांकडे दुर्लक्ष करतात. स्थानिक अधिकारीही पैशासाठी त्यांना मदत करतात. कधी शॉर्ट सर्किट कधी विजेचा जास्त दाब तर कधी छोट्या हॉटेलमधील गॅसच्या सिलिंडरचा स्फोट; छोटे कारण पुरते. आग मोठी लागते. अनेकजण मरण पावतात. मग चौकशी, "फायर ऑडिट'' यांच्या घोषणा होतात. त्या लवकरच विसरल्या जातात. अग्नी प्रतिबंधक इमारत उभारणे सक्तीचे केले नाही तर अशा दुर्घटना परत परत घडतच

## रक्ताच्या कर्करोगाची मुख्य लक्षणे

सततचा थकवा, वारंवार येणारा ताप, विनाकारण वजन कमी होणे, त्वचेवर चट्टे किंवा सहज रक्तस्राव होणे आणि रात्री जास्त घाम येणे होय. ही लक्षणे दीर्घकाळ राहिल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.रक्ताच्या कर्करोगाची काही प्रमुख आणि सुरुवातीची लक्षणे खालीलप्रमाणे आहेत:सततचा थकवा आणि अशक्तपणा: पुरेशी विश्रांती घेतल्यानंतरही दिवसभर खूप थकवा जाणवणे आणि फिकटपणा दिसणे.वारंवार संसर्ग (Infection): शरीरातील पांढऱ्या रक्तपेशी (WBC) कमी झाल्यामुळे वारंवार सर्दी, ताप किंवा इतर संसर्ग होणे.रक्तस्राव आणि जखमा: हिरड्यांमधून रक्त येणे, नाकातून रक्तस्राव होणे किंवा किरकोळ धडपडीनेही त्वचेवर निळसर चट्टे किंवा जखमांचे डाग (Bruises) पडणे.रात्री घाम येणे (Night Sweats): झोपेत असताना खूप जास्त प्रमाणात घाम येणे.वजन कमी होणे: कोणत्याही स्पष्ट



कारणाशिवाय अचानक खूप वेगाने वजन कमी होणे. सूज आणि वेदना: मानेच्या, बगलेच्या किंवा जांघेतील लिम्फ नोड्समध्ये वेदनाविरहित सूज येणे तसेच पोटात डाव्या बाजूला जडपणा वाटणे. हाडे किंवा सांधेदुखी: हाडांमध्ये किंवा सांध्यामध्ये सतत दुखणे.श्वास लागणे: थोडेसे चालल्यावरही धाप लागणे किंवा श्वास घ्यायला त्रास होणे.

## राष्ट्रउभारणीत महिलांचे योगदान लक्षणीय

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाचे न्यायमूर्ती संजय करोल आणि एन के सिंग यांनी देशाची मानव संपत्ती अर्थात मनुष्यबळ घडवण्यात महिलांचे लक्षणीय योगदान आहे आणि त्यामुळेच जगातील मोठी अर्थव्यवस्था हे स्वप्न आपण साकार करू शकलो असे गौरवोद्गार काढले आहेत. महिला राष्ट्र उभारणीत अप्रत्यक्ष योगदान प्रदान करत आहेत. त्यामुळे महिला या राष्ट्राच्या आधारस्तंभ आहेत. आणि तीच त्यांची ओळख आहे असेही न्यायालयाने नमूद केले आहे. खरकटी महिला घर सांभाळतात, रांधतात, वाढतात, उष्टी काढतात, कपडे/ भांडीकुंडी धुतात, घर स्वच्छ राखतात तेव्हा त्या थेट आपल्या संसारासाठी राबत असतात. घराची उत्पादकता आणि उत्पन्न गृहिणीच्या घर राखण्या आणि राबण्यामुळे वाढत जाते. असे असताना महीलांचे स्वतःचे असे उत्पन्न नाही असे कसे म्हणता येईल ? गृहिणी ही कमावत्या व्यक्तींवर अवलंबून असते असे चुकीचे म्हटले जात असताना घराचे संपूर्ण कार्यान्वयन हे गृहिणींमुळेच होते याकडे दुर्लक्ष केले जाते. घरातील कमावत्या व्यक्ती या संपूर्णतः गृहिणींवर अवलंबून असतात. गृहिणींचे मासिक उत्पन्न हे किमान रु तीस हजार गृहीत धरून एका प्रकरणात न्यायालयाने नुकसानभरपाई परिगणित केली आहे.

एका गृहिणीचा दि २५ नोव्हेंबर २००१ रोजी अपघाती मृत्यू झाला. त्या गृहिणीच्या कुटुंबियांना द्यावयाच्या नुकसान भरपाईचा मुद्दा मोटार अपघात न्यायाधिकरणातून पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात पोहचला. तिथे तो नुकसान भरपाईची नेमकी परिगणना कोणत्या आधारावर करायची यासाठी २२ वर्षे प्रलंबित होता. सर्वोच्च न्यायालयात आल्यावर तो ३ वर्षांनी सुनावणीला आला होता. त्यावर न्यायालयाने घराचे स्थैर्य आणि जमाखर्च हा संपूर्णतः गृहिणीवर अवलंबून असतो हे प्रतिपादन करून उच्च न्यायालयाने मंजूर केलेली नुकसान भरपाईची रक्कम ही रु ८.४ लक्ष वरून वाढवून रु ६३ लाख केली आणि ७.५ % दराने सन २००१ पासून व्याज देण्याचे आदेश दिले.

**महिलांना प्रतिष्ठा**

गृहिणी कुटुंबाच्या चिंता वाहतात. घरासाठी झटतात. काबाडकष्ट उपसतात. त्यांच्या या सर्व मेहनतीचा भारताच्या (जेडीपी) सकल राष्ट्रीय उत्पन्नात १५ ते १७ % वाटा आहे. आणि तरीही ही सर्व मेहनत मानधनाविना आणि अदखलपात्र असते. देशातील सर्व गृहिणी मिळून दररोज १६ अब्ज तास हे बिनपगारी घरगुती काम आणि सेवा यासाठी समर्पित करतात. पारंपारिक विचारसरणी यामुळे गृहिणींच्या योगदानाला पुरेशी प्रतिष्ठा लाभत नाही. समाजाने विशाल मनाचा प्रत्यय देऊन महिलांच्या कष्टाला महत्व आणि मानधन देणे आवश्यक आहे. असा न्यायालयाच्या म्हणण्याचा अर्थ आहे.

समाजात महिलांना दुय्यम वागणूक मिळत होती. महिला या आपल्या आणि लेकरांच्या जगण्यासाठी सतत संघर्ष करत असलेल्या दिसून येतात. विशेषतः २४ द ७ या काळात गृहिणी म्हणून वावरणार्या महिला याच घर चालवतात. स्वयंपाक ते औषधपाणी, गृहपाठ ते वाणसामान, सणसमारंभ ते रीतभात, व्यवहार ते टापटीप त्या पाहतात. महिलांना देवी आणि आई समजून पुजणारी आपली संस्कृती होती. दरम्यानच्या काळात समाजाच्या एका कालखंडात महिलांना मान प्रतिष्ठा लाभली नाही. आताही तसे नव्या पिढीत महिलांबद्दल पुरेसे आदराचे वातावरण असल्याचे दिसून येत नाही. जेव्हा महिला या शिक्षणाची कास धरून पुढे चालू लागल्या आणि दोन पैसे कमवू लागल्या तेव्हा कुठे समाजाला महिलाशक्तीची जाणीव झाली. आज जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिला या अग्रेसर आहेत. त्यांनी जीवन स्वावलंबी करण्याला प्राधान्य दिले आहे. तथापि घर आणि नोकरी करणार्या महिलांच्या सार्थकता आणि परिपूर्णता या कसरतीत कुठेतरी हरवून गेली आहे. स्वावलंबित्व आले पण आईपणाचे सत्व गेले, आधुनिकता आली पण घराचे घरपण गेले.

**घराचे घरपण जपले**

जुन्या काळातील गृहिणींचे जगणे अधिक सोशिक असले तरी ते घरपण, ममता, सेवा याने भरलेले होते. त्या काळी समाजातील गृहिणींनी कधी त्यांच्या घरकामाचे मोल केले नाही की कोणाकडे मागितले नाही. त्यांनी सर्व भूमिका निष्ठेने निभावल्या. त्यांना घराचे सर्वस्व ही उपाधी आणि घरातील सदस्यांचे आपलेपण हे पुरेसे होते. त्याकाळी पांग फेडणारा कुटुंब कबिला आणि नातेसंबंधातील ओलावा जपणारा एकसंध समाज होता. दुर्दैवाने हे वातावरण



शिक्षणामुळे आलेले अनावश्यक भान, कायद्याचा दुरुपयोग, स्वार्थाचा बाजार, पैसा आणि आधुनिकता याला लाभलेले अवास्तव महत्व यामुळे वेगाने लयास गेले. आईची मम्मा किंवा मॉम झाली आणि तिथेच सात्विकता नष्ट झाली. लेकरांच्या डोक्यावर सावली धरणारा, त्यांचा चेहरा पुसणारा, चालताना धरायचा आईचा पदर काळाच्या ओघात नष्ट झाला. आज एकीकडे गृहिणीच्या मृत्यूची नुकसानभरपाई न्यायालयाला ठरवावी लागत आहे आणि दुसरीकडे कुटुंब न्यायालयात बायको नवर्याकडून कायमची नुकसान भरपाई म्हणून लाखो रुपये घेऊन परस्पर संमतीने घटस्फोट अर्जावर सही करत आहे.

एकीकडे सर्वोच्च न्यायालय गृहिणींचे मासिक उत्पन्न हे किमान रु तीस हजार गृहीत धरून एका प्रकरणात नुकसानभरपाई परिगणित करते आहे आणि दुसरीकडे सुशिक्षित गृहिणी या प्रपंचात अवास्तव आधुनिकता आणि दिखाउपणा याच्या आहारी जात आहेत. सोशल मिडीयाने महिलांचा अवकाश गिळून टाकला आहे. आज गृहिणींचे घरदार सांभाळून असणे अत्यावश्यक झाले असताना सोशल मिडीयावरील प्रदर्शन ओंगळवाणे आहे. समाजात गृहिणीचे निरंतर राबणे हे अध्याहृत आहे. ते कधीही रोख स्वरूपात अदा केले जात नाही. कारण गृहिणी पद गृहिणीला स्वामिनीत्व बहाल करते. अशा गृहिणीच्या अर्धांगिनी, आई, सून, सासू, आजी या भूमिका त्यांच्या जीवनाची सार्थकता असतात. पण अशा भूमिका निभावणार्या गृहिणी समाजात शेष आहेत ? आज गृहिणींचे युग लोटण्याच्या मार्गावर असताना आधुनिक, टेक्नोसॅव्ही तरुणींचे, युवतींचे साम्राज्य असण्याच्या काळात घर हे लॉज किंवा हॉटेल आणि जगणे 'इव्हेंट' झाले आहे.

**– , सुरेश कोडितकर**

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



खरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.डॉ. संजय देशपांडे, कन्सल्टंट सेक्सॉलॉजिस्टखरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. **(क्रमश. )**

## २ Joke — विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message — संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought — सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.– **डॉन प्याट**


**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रिय:।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

## मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दुःखी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### आडवे उत्तरे

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अवास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तरे

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारत ऑस्ट्रेलिया सामन्यासाठी बदलली वैभवचा डेब्यू असलेल्या भारत आयर्लंडच्या सामन्याची वेळ

नवी दिल्ली–भारत आणि आयर्लंड यांच्यात दोन टी २० सामने २६ आणि २८ जून रोजी होणार आहेत. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात भारतीय टीम बेलफास्टला पोहचली आहे. या टीममध्ये १५ वर्षांचा वैभव सूर्यवंशीही आहे. ज्याच्यावर कोट्यवधी चाहत्यांच्या नजरा आहेत. याच ऊ२० सीरिजबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

नियोजित वेळेपेक्षा एक तास आधी सुरु होणार सामने. २६ आणि २८ जून रोजी होणारे टी २० सामने हे आपल्या नियोजित वेळेपेक्षा एक तास आधी सुरु होतील. गुरुवारी क्रिकेट आयर्लंडने ही माहिती दिली की दोन्ही सामने वेळेच्या एक तास आधी सुरु होतील. भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ६ वाजता हे सामने सुरु होतील. याआधी हे दोन्ही सामने भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता सुरु होणार होते. दोन्ही सामन्यांची वेळ का बदलली? दोन्ही सामन्यांची वेळ बदलण्यामागे एक खास कारण आहे. वुमन्स टी २० विश्वचषक २८ जूनला भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणारा ग्रुप एचा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता सुरु होणार आहे. भारतीय महिला संघासाठी हा सामना अतिशय महत्त्वाचा आहे.

### वर्ल्ड कपमधून बाहेर झाल्यानंतर पाकिस्तानच्या कोच आणि कर्णधारामध्ये वाद ; नेमके घडले काय?

दिल्ली–आयसीसी टी– २० वर्ल्ड कप २०२६ मधून बाहेर झाल्यानंतर पाकिस्तान महिला संघात मोठा राडा झाला आहे. यंदाच्या वर्ल्ड कपमध्ये पाकिस्तानला चार पैकी एकही सामना जिंकता आलेला नाही. यामुळे संघात मोठा वाद झाल्याचे दिसून आले.पाकिस्तानची कॅप्टन आणि कोच यांच्यात हा वाद झाला आहे. वादाचा व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. नेमके घडले काय? ऑस्ट्रलियाविरुद्धच्या सामन्यात पराभव झाल्याने पाकिस्तानची वर्ल्ड कपच्या उपांत्य फेरीत जाण्याची शक्यता मावळली. सामना संपल्यानंतर पाकिस्तानचा कोच वाहाब रियाज आणि फातिमा सना यांच्यात कडाक्याचे भांडण झाले. ऑस्ट्रेलियाने ११३ इतक्या मोठ्या धावांच्या फरकाने पराभव केला होता. मोठा पराभव झाल्यामुळे पाकिस्तानचा कोच वाहाब रियाज फातिमा सनावर भलताच भडकला होता. या दोघांसोबत आणखी एक सपोर्ट स्टाफ देखील होता.त्याच्यासमोर मैदानात हा संपूर्ण राडा झाला होता. विशेष म्हणजे या व्हिडीओत फातिमा सनानं बोलताना कोच वाहाब रियाजकडे एकदाही बघितलं नाही. याआधी टीम सिलेक्शनवरूनही वाद झाला होता.

### भारत की आयर्लंड, टी-२० मध्ये कोणाचे पारडे जड? पाहा दोन्ही संघांचा हेड-टू-हेड रेकॉर्ड

दिल्ली–अफगाणिस्तानला मायदेशात धूळ चारल्यानंतर भारतीय संघ आयर्लंड दौऱ्यावर रवाना झाला आहे. भारत आणि आयर्लंड या दोन्ही संघांमध्ये २ टी–२० सामन्यांची मालिका होणार आहे. या मालिकेत श्रेयस अय्यर टी–२० कर्णधार म्हणून पदार्पण करणार आहे. मालिकेतील पहिला सामना २६ जूनला बेलफास्टमध्ये खेळवला जाणार आहे. या मालिकेचं मुख्य आकर्षण म्हणजे, वैभव सूर्यवंशीला पदार्पण करण्याची संधी दिली जाऊ शकते. दरम्यान कसा राहिलाय भारत आणि आयर्लंड यांचा टी–२० रेकॉर्ड? जाणून घ्या. भारतीय संघ टी–२० वर्ल्ड चॅम्पियन संघ आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने सलग दुसऱ्यांदा जेतेपदाचा मान पटकावला होता. आता या स्पर्धेनंतर पहिल्यांदाच टी–२० मालिका खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. त्यामुळे भारतीय संघ दमदार सुरुवात करण्याच्या प्रयत्नात असणार आहे. या मालिकेसाठी काही युवा खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. भारत–आयर्लंड हेड टू हेड रेकॉर्ड–भारत आणि आयर्लंड हे दोन्ही संघ आतापर्यंत ८ वेळेस आमनेसामने आले आहेत. भारतीय संघाने आतापर्यंत झालेल्या सर्व सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे.

### कतारच्या खेळाडूची मोठी चूक महागात! फुटबॉल विश्वचषकात ५ सामन्यांची बंदी, घेतला मोठा निर्णय

दिल्ली–कतार आणि कॅनडा यांच्यामध्ये फीफा विश्वचषक २०२६ चा सामना झाला या सामन्यात खेळाडूला गंभीर दुखापत झाली आहे. कतारचा खेळाडू असिम मदिबूने केलेल्या कृत्यामुळे त्याच्यावर एक–दोन नव्हे, तर तब्बल पाच सामन्यांची बंदी घालण्यात आली आहे. फीफा विश्वचषक २०२६ चा कतारचा शेवटचा लीग सामना पार पडला, या सामन्यात त्याचा शेवटचा लीग सामना हा कॅनडाविरुद्ध झाला आणि त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. या सामन्यामध्ये कॅनडाच्या खेळाडूला गंभीर दुखापत झाली आहे, या सामन्यामध्ये विश्वचषक सामन्यात असिम मदिबूने कॅनेडियन मिडफिल्डर इस्माईल कोनेचा पाय मोडला होता. बुधवारी, फिफाने या प्रकरणात या खेळाडूवर पाच सामन्यांची बंदी घातली.१८ जून रोजी झालेल्या कॅनडा विरुद्ध कतार हा सामना व्हँकुव्हर येथे खेळवण्यात आला. या सामन्यामध्ये कॅनडाने कतारचा ६–० असा पराभव केला. या सामन्यामध्ये चुकीच्या टॅकलसाठी रेफरीने लगेचच रेड कार्ड दाखवले. फीफाच्या नियमांचं पालन न केल्यामुळे समितीने कठोर शिक्षा दिली आहे .

# फिफा मध्ये आज ६ सामने, यंदाच्या विश्वचषकात एकही गोल न केलेला तुर्की अमेरिकेशी भिडणार

मुंबई–फिफा विश्वचषक २०२६ मध्ये आज रात्री जर्मनीचा सामना इक्केडोरशी होईल. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये इक्केडोरने जर्मनीला कधीही पराभूत केलेले नाही. हा सामना न्यू जर्सी स्टेडियमवर पहाटे १:३० वाजता खेळला जाईल. तुर्कीचा सामना अमेरिकेशी सकाळी ७:३० वाजता होईल. तुर्कीने या स्पर्धेत अद्याप एकही गोल केलेला नाही. एकूण सहा सामने खेळले जातील, जे सर्व भारतीय वेळेनुसार २६ जून रोजी होतील.

नॉकआऊट फेरी गाठण्यासाठी आयव्हरी कोस्टला सामना बरोबरीत सोडवण्याची गरज : गट 'इ' मध्ये तीन गुणांसह दुसऱ्या स्थानावर असलेल्या आयव्हरी कोस्टला पुढील फेरीत जाण्यासाठी फक्त बरोबरीची गरज आहे. गुणतालिकेत एका गुणासह तळाशी असलेल्या कुराकाओला हा सामना कोणत्याही परिस्थितीत जिंकावाच लागेल. दोन्ही देशांमधील हा पहिलाच आंतरराष्ट्रीय सामना असेल. कुराकाओला मिडफिल्डर ताहिथ चोंगकडून जादूची अपेक्षा असेल. तर आयव्हरी कोस्ट अनुभवी मिडफिल्डर फ्रँक केसीच्या कामगिरीवर अवलंबून असेल.

**कुराकाओही उतरणार मैदानात**



इक्केडोरला जर्मनीविरुद्ध विजय मिळवणं आवश्यक : सुपर ३२ साठी आधीच पात्र ठरलेला जर्मनी, आता इक्केडोरचा सामना करेल. जर्मनी दोन सामन्यांतून ६ गुणांसह गट 'इ' मध्ये अव्वल स्थानी आहे. केवळ एक गुण असलेला इक्केडोर तिसऱ्या स्थानावर आहे. बाद फेरीतील आपल्या आशा जिवंत ठेवण्यासाठी त्यांना हा सामना जिंकणे आवश्यक आहे. या दोन देशांमध्ये दोन आंतरराष्ट्रीय सामने झाले असून, दोन्ही वेळा जर्मनीने विजय मिळवला आहे. विश्वचषकाच्या इतिहासातील ही त्यांची दुसरी भेट असेल. २००६ च्या विश्वचषकात जर्मनीने इक्केडोरला ३–० ने पराभूत केले होते. इक्केडोरला त्यांचा स्टार फॉरवर्ड एनर व्हॅलेन्सियाकडून गोलची अपेक्षा असेल. फॉर्मात असलेला विंगर जमाल मुसियाला जर्मनीसाठी आक्रमक खेळ करु शकतो.

स्वीडनविरुद्ध सामना बरोबरीत सुटल्यास जपान बाद फेरीत : गट 'एफ' मध्ये असलेला जपान ४ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. स्वीडन ३ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. जपाननं हा सामना बरोबरीत सोडवला तरी तो बाद फेरीत प्रवेश करेल. दुसरीकडे, स्वीडनला पुढं जाण्यासाठी विजयाची गरज आहे. विश्वचषकातील या दोन देशांमधील ही पहिलीच भेट असेल. त्यांनी आतापर्यंत दोन आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. जपाननं एक सामना जिंकला असून एक सामना अनिर्णित राखला आहे. जपानला त्यांचा स्टार स्ट्रायकर, आयासे उएदाकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा असेल. स्वीडनचा संघ फॉर्मात असलेल्या फॉरवर्ड, अलेक्झांडर इसाकवर अवलंबून असेल.

स्पर्धेतून आधीच बाहेर पडलेल्या ट्युनिशियाचा सामना नेदरलँड्सशी : नेदरलँड्स आणि ट्युनिशिया 'एफ' गटात आहेत. सलग दोन पराभवांमुळं ट्युनिशिया स्पर्धेतून आधीच बाहेर पडला आहे. दुसरीकडे, नेदरलँड्स चार गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानी आहे. या दोन देशांमध्ये एकूण तीन आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले आहेत. नेदरलँड्सनं एक सामना जिंकला असून दोन अनिर्णित राखले आहेत. विश्वचषकात हा त्यांचा पहिलाच सामना असेल. नेदरलँड्सचा संघ त्यांचा स्टार फॉरवर्ड, मेम्फिस डेपेवर अवलंबून असेल, तर ट्युनिशियाला कर्णधार युसेफ मशाकनीच्या चांगल्या कामगिरीची अपेक्षा असेल.

यजमान अमेरिकेसमोर तुर्कीचं आव्हान : 'डी' गटात अमेरिकेनं सलग दोन विजय मिळवून बाद फेरीतील आपलं स्थान निश्चित केलं आहे. ते सहा गुणांसह गटात पहिल्या स्थानावर आहेत. दरम्यान, तुर्की सलग दोन पराभवांनंतर स्पर्धेतून बाहेर पडला आहे. त्यांना स्पर्धेत एकही गोल करता आलेला नाही. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत फक्त एकच आंतरराष्ट्रीय सामना खेळला गेला आहे, ज्यात तुर्कीनं २–१ नं विजय मिळवला. विश्वचषकातील दोन्ही संघांमधील ही पहिलीच भेट असेल. अमेरिका आपला मुख्य स्ट्रायकर फोलारिन बालोगुनकडून गोलची अपेक्षा करत असेल, तर तुर्की आपला युवा स्टार अर्दा गुलरवर अवलंबून आहे.

पराग्वे विरुद्ध ऑस्ट्रेलिया सामन्याचा विजेता बाद फेरीसाठी पात्र ठरेल : गट 'डी' मध्ये पराग्वे आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात एक महत्त्वपूर्ण सामना खेळला जाईल. दोन्ही संघांसाठी बाद फेरीत पोहोचण्याची ही शेवटची संधी आहे. दोन्ही संघ सध्या प्रत्येकी ३ गुणांवर बरोबरीत आहेत. या सामन्याचा विजेता थेट बाद फेरीसाठी पात्र ठरेल. आतापर्यंत दोन्ही देशांमध्ये एकूण पाच आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले आहेत, त्यापैकी ऑस्ट्रेलियानं दोन जिंकले आहेत आणि तीन सामने अनिर्णित राहिले आहेत. विश्वचषकाच्या इतिहासात दोन्ही संघांमधील हा पहिलाच सामना असेल. पॅराग्वेला युवा फॉरवर्ड ज्युलिओ एन्सीसोकडून मोठ्या अपेक्षा असतील, तर ऑस्ट्रेलियाला त्यांचा कर्णधार आणि अनुभवी गोलकीपर मॅथ्यू रायनकडून दमदार कामगिरीची गरज असेल.

## भारतीय खेळाडू, राजस्थानहून आयर्लंडला कसा पोहोचला?

मुंबई–भारतामध्ये क्रिकेट खेळणाऱ्या प्रत्येक खेळाडूचं स्वप्न हे एक दिवस टीम इंडियाकडून खेळणं असतं, पण क्रिकेटमध्ये स्पर्धा इतकी वाढली आहे की अनेकांचं हे स्वप्न पूर्ण होत नाही. क्रिकेटच्या जिद्दीमुळे हे खेळाडू दुसऱ्या देशाकडून खेळायलाही जातात. काही दिवसांपूर्वी भारताच्याच निखील चौधरी याने ऑस्ट्रेलियासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं. आता राजस्थानच्या टोंक जिल्ह्यात राहणारा जय मुंदडा आयर्लंडकडून खेळणार आहे. २६ जूनपासून भारताविरुद्ध सुरू होणाऱ्या टी–२० सीरिजसाठी जय मुंदडा याची आयर्लंडच्या टीममध्ये निवड झाली आहे. २९ वर्षांचा जय मुंदडा हा डावखुरा फास्ट बॉलर आहे. आयर्लंडच्या टीममध्ये निवड झाल्याबद्दल जय मुंदडाचं कुटुंब आनंदी आहे. जयची बहिण मानसीने याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. ममला खूप आनंद झाला आहे, भावाचं स्वप्न पूर्ण झालं. त्याला जे हवं होतं ते त्याने मिळवलं. घरामध्ये सगळेच आनंदी आहेत. सगळे जण त्याला आशिर्वाद देत आहेत. त्याने खूप पुढे जावं आणि जास्तीत जास्त प्रगती करावी. तो लहानपणापासूनच क्रिकेट खेळत आहेफ, असं जयची बहिण म्हणाली.



राजस्थानहून आयर्लंडला कसा पोहोचला? जय मुंदडा २०२१ मध्ये एमटेकचं शिक्षण घेण्यासाठी आयर्लंडला गेला. शिक्षण घेत असतानाही त्याने क्रिकेट खेळणं सुरू ठेवलं. आयर्लंडमध्ये काम करताना जय मुंदडाला आयर्लंडची नागरिकता मिळाली, यानंतर आता त्याचं आयर्लंडच्या टीममध्ये सिलेक्शन झालं आहे. जयने सगळ्यात आधी आयर्लंडच्या स्थानिक क्रिकेट टीम लेनस्टरमध्ये स्थान मिळवलं. ऑगस्ट २०२४ मध्ये लेनस्टरसाठी त्याने टी–२० क्रिकेटमध्ये पदार्पण केलं. यानंतर पुढच्याच वर्षी मे २०२५ मध्ये जयने लेनस्टरसाठी लिस्ट ए आणि मे २०२६ मध्ये फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये पदार्पण केलं. जयने आतापर्यंत १ प्रथम श्रेणी, ६ लिस्ट ए आणि ५ टी–२० सामने खेळले आहेत. एकमेव फर्स्ट क्लास सामन्यामध्ये त्याला विकेट मिळाली नाही, पण बॅटिंग करताना त्याने ५० रन केले. लिस्ट ए क्रिकेटच्या ६ सामन्यांमध्ये त्याने ११ विकेट आणि ५ टी–२० सामन्यांमध्ये १० विकेट मिळवल्या आहेत.

## धोनी, कोहली आणि रोहितला आकाशदीपने लग्नाला का आमंत्रित केले नाही? खेळाडूला स्वत: केला खुलासा





मुंबई–भारताचा संघ हा आयर्लंडविरुद्ध यांच्यामध्ये सामना सुरु व्हायला काही तास शिल्लक आहेत. त्याआधी भारताचा खेळाडू आकाशदीप याचा विवाहसोहळा पार पडला आहे. यामध्ये काही भारतीय संघातील खेळाडू देखील त्याच्या लग्नामध्ये सामील झाले होते, पण असे अनेक दिग्गज खेळाडू हे लग्नामध्ये सामील झाले नाहीत. आकाशदीपने त्याचा विवाहसोहळा हा रोहतास जिल्ह्यातील बद्दी गावात पार पडला, त्याने हा विवाहसोहळा पारंपारिक पद्धतीने आयोजित केला होता. आता त्याच्या लग्नाचे काही फोटो आणि व्हिडिओ हे सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत, आकाशदीपने बुधवारी काशी येथे अक्षितासोबत लग्न केले.

आता क्रिकेट खेळाडू आकाशदीपचा विवाहसोहळा पार पडला, यामध्ये आकाशदीपने आता एका मोठ्या प्रश्नाचे मनोरंजक उत्तर दिले आहे. आकाशदीपला त्याच्या मित्राने प्रश्न केला की लग्नाला रोहित शर्मा, विराट कोहली आणि धोनी भाई का आले नाहीत? त्यावर आकाश हसून म्हणाला, ''वाराणसीमध्ये लग्न शक्य होईल का?'' त्याचा असा अर्थ होता की, जर हे स्टार्स आले असते, तर गर्दीमुळे लग्न करणे अशक्य झाले असते. हे खेळाडूचे मनोरंजक उत्तर सोशल मिडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. आकाशदीपचा विवाहसोहळा मोठ्या उत्साहात पार पडला, हा विवाह सोहळा आनंदमय होता, ज्यात कुटुंब, नातेवाईक आणि जवळचे पाहुणे उपस्थित होते.

गेल्या चार दिवसांपासून आकाश दीपच्या घरी लग्नसमारंभ सुरू होते. त्याचे घर रोहतास जिल्ह्यातील शिवसागर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बद्दी गावात आहे. या काळात त्याचे कुटुंबीय आणि नातेवाईक लग्नाच्या तयारीत व्यस्त होते. संपूर्ण गावात उत्सवाचे वातावरण होते. आपला मुलगा भारतीय संघाचा एक प्रमुख खेळाडू बनल्याने लोक खूप आनंदित झाले होते. आकाशदीपची पत्नी अक्षिता राज हिच्याबद्दल बोलायचे झाल्यास, ती सुद्धा रोहतास जिल्ह्यातीलच आहे. ती देहरी भागातील माणिकपूर गावची रहिवासी आहे. तिच्या वडिलांचे नाव अमित सिंग असून, तिचे कुटुंब मध्यमवर्गीय आहे.

आकाशदीपच्या कामगिरीबद्दल सांगायचे झाले तर त्याने आतापर्यंत भारताच्या कसोटी संघात पदार्पण केले आहे. त्याने भारतासाठी आतापर्यंत १० कसोटी सामने खेळले आहेत, यामध्ये त्याने २८ विकेट्स घेतले आहेत. त्याच्या सर्वोत्तम कामगिरीबद्दल सांगायचे झाले तर त्याने कसोटीमध्ये ६० धावा देत ६ बळी घेतले आहेत. तर त्याने एका सामन्यात ११२ धावा देत १० बळी देखील घेतले आहेत.

भारताच्या संघाची मागील वर्षी झालेल्या अँडरसन–तेंडुलकर मालिकेमध्ये त्याने दमदार कामगिरी केली होती त्याने या मालिकेत १२ विकेट्स घेतले होते. कोलकाता नाईट रायडर्सने आयपीएल २०२६ साठी आकाशदीपला संघात घेतले होते, परंतु दुखापतीमुळे तो संपूर्ण हंगाम खेळू शकला नाही.

# श्रेयसच्या इंस्टाग्राम बायोमुळे सोशल मिडियावर खळबळ!

दिल्ली–भारतीय टी२० संघाचा नवा कर्णधार श्रेयस अय्यर काही तासांमध्ये भारतीय संघ श्रेयस अय्यरच्या कॅप्टन्सीमध्ये पहिल्यांदा सामना खेळणार आहे. भारत विरुद्ध आयर्लंड यांच्यामध्ये मालिका सुरु व्हायला काही तास शिल्लक असताना आता टीम इंडियाचा कर्णधार श्रेयस अय्यर हा त्याच्या सोशल मिडियावरील बायोमुळे चर्चेत पाहायला मिळाला आहे. श्रेयस अय्यर हा नेहमीच सोशल मिडियावर त्याच्या फॅशनमुळे त्याचबरोबर क्रिकेट मैदानावर तो त्याच्या खेळीमुळे चर्चेत पाहायला मिळतो. त्याने त्याच्या फिल्डिंगने अनेकदा सर्वांचे लक्ष वेधले आहे. आता श्रेयस अय्यर चर्चेत असल्याचे कारण म्हणजेच इंस्टाग्रामचा बायो. असे त्याने सोशल मिडियावर नक्की काय लिहीले आहे आणि त्यामागचे कारण काय यासंदर्भात सविस्तर जाणून घ्या.

श्रेयस अय्यरने त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवर ''२५.१२.२०२५'' ही दुसरी जन्मतारीख लिहीली आहे. आता श्रेयस अय्यरने त्याच्या सोशल मिडियावर असे का लिहीले आहे यासंदर्भात सविस्तर स्पष्टीकरण आम्ही तुम्हाला देणार आहोत. श्रेयस अय्यरची खरी जन्म तारीख ही ६ डिसेंबर १९९४ आहे, मग त्याने इंस्टाग्राम २५.१२.२०२५ ही तारीख का लिहीली आहे. इंस्टाग्रामवर लिहीलेल्या या जन्मतारखेबद्दल सांगायचे झाले तर हा श्रेयस अय्यरच्या आयुष्यातील सर्वात कठीण काळ होता. त्याने यासंदर्भात स्पष्टीकरण दिले नाही पण चाहत्यांनी हा अंदाज लावला आहे.



ऑक्टोबर २०२५ मध्ये भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये सामना सुरु होता. या सामन्यामध्ये सिडनी क्रिकेट ग्राउंडवर ऑस्ट्रेलियाविरुद्ध श्रेयस अय्यरला गंभीर दुखापत झाली होती. तिसऱ्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकदिवसीय सामन्यात कॅच घेताना श्रेयस अय्यर गंभीर जखमी झाला होता. त्याला या सामन्यात स्ट्रेचरवरुन नेण्यात आले होते, त्यानंतर अनेक महिने तो क्रिकेटपासून दूर राहिला आहे. यावेळी त्याच्या बरगडीला दुखापत झाली होती आणि यावेळी ही एवढी गंभीर दुखापत झाली होती की त्याचे क्रिकेटमध्ये पुनरागमन देखील कठिण होते असे त्याने यासंदर्भात सांगितले होते. या दुखापतीमुळे त्याची प्लीहा फुटली आणि अंतर्गत रक्तस्राव झाला, ज्यामुळे त्याला सिडनी येथील रुग्णालयात डॉक्टरांच्या देखरेखीखाली राहावे लागले या दुखापतीनंतर पूर्णपणे बरे होऊन रुग्णालयातून घरी सोडण्यापूर्वी रक्तस्राव थांबवण्यासाठी त्याच्यावर एक छोटी शस्त्रक्रिया करावी लागली. त्याने सोशल मिडियावर लिहीलेला बायो हा ''२५.१२.२०२५'' ही तारीख एका नव्या सुरुवातीचे चिन्ह आहे. त्यामुळे त्याने ही तारिख लिहीली असावी असा अंदाज आता चाहते लावत आहेत. भारत विरुद्ध आयर्लंड यांच्यामध्ये सुरु होणाऱ्या मालिकेत भारताचा संघ आणि श्रेयस अय्यर हे आता नव्या युगाची सुरुवात करणार आहेत. वर्षाच्या सुरुवातीला सूर्यकुमार यादवच्या कर्णधारपदाखाली टीम इंडियाने टी२० विश्वचषक जिंकला असला तरी, निवड समितीने एक कठोर आणि निर्दयी निर्णय घेत त्याला केवळ कर्णधारपदावरून हटवले नाही, तर संघातून बाहेरचा रस्ताही दाखवला. आता भारताच्या संघाने श्रेयस अय्यरकडे मोठी जबाबदारी सोपवली आहे.

# महाकर्जमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय



शेतकरी राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

**कर्जमुक्ती योजना काय आहे**

२०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही.

याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**एकवेळ समझोता योजना**

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत कालावधी दिला जाणार आहे.

**प्रोत्साहनपर लाभ**

नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.

तसेच, २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात पूर्णत: परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा ५ हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

**नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा**

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ मधील योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्वाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुर्नगठन/फेरपुर्नगठन थकीत हप्त्याची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत रक्कम रु. ५० हजार पर्यंत असल्यास पूर्ण कर्जमुक्ती, आणि रु. ५० हजारांपेक्षा जास्त असल्यास एकवेळ समझोता (जढड) योजनेचा लाभ मिळणार आणि रक्कम भरण्याची मुदत ३१ मार्च २०२७ असणार आहे.

**योजनेचे निकष :**

✻ पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती.

✻ १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू.

✻ ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश.

✻३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश.

**जमीन धारणेची अट नाही**

पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती.

२ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ.

शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे.राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जांना लागू.

**कोण पात्र असणार नाहीत**

✻ विद्यमान किंवा माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा व राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीचे विद्यमान किंवा माजी सदस्य.

✻ केंद्र किंवा राज्य शासनातील असे अधिकारी व कर्मचारी, ज्यांचे एकत्रित मासिक वेतन रु. २५ हजार पेक्षा अधिक आहे.

✻ राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ इ.) तसेच अनुदानित संस्थांतील रु. २५,००० पेक्षा अधिक मासिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारी.

शेतीव्यतिरिक्तच्या उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे २५ हजार पेक्षा अधिक मासिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (मात्र माजी सैनिकांना हा अपवाद लागू राहील).

कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड तसेच सहकारी दूध संघ यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व रु. २५ हजार पेक्षा अधिक एकत्रित वेतन असलेले कर्मचारी. मात्र, सहकारी साखर कारखान्यांतील हंगामी कामगार या अपात्रतेतून वगळण्यात आले असून ते योजनेसाठी पात्र राहतील.

या कर्जमुक्ती योजनेची संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शक असून या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांचे वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**– काशीबाई थोरात,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# आषाढी वारी २०२६ निमित्त पंढरपूर येथे येणाऱ्या वारकऱ्यांसाठी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाकडून ५४ विशेष रेल्वे फेऱ्या

**सोलापूर/प्रतिनिधी :**

आषाढी एकादशी हा महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाच्या आध्यात्मिक उत्सवांपैकी एक असून, लाखो भाविक श्रद्धा आणि भक्तीभावाने पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. यंदा आषाढी एकादशी दिनांक २५ जुलै २०२६ रोजी साजरी होत आहे. या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांच्या प्रवासाच्या गरजा लक्षात घेऊन मध्य रेल्वेने व्यापक प्रवासी सुविधा उपलब्ध करण्याचे नियोजन केले आहे. आषाढी वारी २०२६ साठी पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी सोलापूर रेल्वे विभागामार्फत एकूण ५४ विशेष रेल्वे फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. या विशेष गाड्यांमुळे भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि आरामदायी प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

**✻नागपूर – मिरज आषाढी विशेष (४ फेऱ्या)✻**

✻ गाडी क्र. ०१२०५ विशेष नागपूरहून दि. २३ व २४ जुलै २०२६ रोजी सकाळी ०८.५० वाजता सुटेल व दुसऱ्या दिवशी सकाळी ११.५५ वाजता मिरज येथे पोहोचेल. (२ फेऱ्या)

**पंढरपूर आगमन/प्रस्थान:** सकाळी ०८.०० / ०८.२५

✻ गाडी क्र. ०१२०६ विशेष मिरजहून दि. २४ व २५ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.५५ वाजता सुटेल व दुसऱ्या दिवशी दुपारी १२.२५ वाजता नागपूर येथे पोहोचेल. (२ फेऱ्या)

**पंढरपूर आगमन/प्रस्थान:** दुपारी ०३.५५ / ०५.००

थांबे: अजनी, वर्धा, पुलगाव, धामणगाव, चांदूर, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर, दौंड, कुर्डुवाडी, पंढरपूर, सांगोला, म्हसोबा डोंगरगाव, जत रोड, ढालगाव, कवठेमहंकाळ, सलगरे आणि अरग.

रचना: २ वातानुकूलित तृतीय श्रेणी, १० शयनयान, ६ सामान्य द्वितीय श्रेणी (२ लगेज-कम-गार्ड ब्रेक व्हॅनसह) - एकूण १८ डबे.

**✻नवीन अमरावती – पंढरपूर आषाढी विशेष (४ फेऱ्या)✻**

✻ गाडी क्र. ०१११९ विशेष नवीन अमरावतीहून दि. २१ व २४ जुलै २०२६ रोजी दुपारी २.४० वाजता सुटेल व दुसऱ्या दिवशी सकाळी ९.१० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल. (२ फेऱ्या)

✻ गाडी क्र. ०११२० विशेष पंढरपूरहून दि. २२ व २५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता सुटेल व दुसऱ्या दिवशी दुपारी १२.५० वाजता नवीन अमरावती येथे पोहोचेल. (२ फेऱ्या)

थांबे: बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, जळंब, नांदुरा, मलकापूर, बोदवड, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर, दौंड आणि कुर्डुवाडी.

रचना: २ वातानुकूलित तृतीय श्रेणी, १० शयनयान, ६ सामान्य द्वितीय श्रेणी (२ लगेज-कम-गार्ड ब्रेक व्हॅनसह) - एकूण १८ डबे.

**✻खामगाव – पंढरपूर आषाढी विशेष (४ फेऱ्या)✻**

✻ गाडी क्र. ०११२१ विशेष खामगावहून दि. २२ व २५ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता सुटेल व दुसऱ्या दिवशी पहाटे ३.३० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल. (२ फेऱ्या)

✻ गाडी क्र. ०११२२ विशेष पंढरपूरहून दि. २३ व २६ जुलै २०२६ रोजी पहाटे ५.०० वाजता सुटेल व त्याच दिवशी सायंकाळी ७.३० वाजता खामगाव येथे पोहोचेल. (२ फेऱ्या)

थांबे: जळंब, नंदुरा, मलकापूर, बोदवड, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर, दौंड आणि कुर्डुवाडी.

रचना: २ वातानुकूलित तृतीय श्रेणी, १० शयनयान, ६ सामान्य द्वितीय श्रेणी (२ लगेज-कम-गार्ड ब्रेक व्हॅनसह) - एकूण १८ डबे.




**✻भुसावळ – पंढरपूर अनारक्षित आषाढी विशेष (४ फेऱ्या)✻**

✻ गाडी क्र. ०११५९ विशेष भुसावळहून दि. २४ व २५ जुलै २०२६ रोजी दुपारी १.३० वाजता सुटेल व दुसऱ्या दिवशी पहाटे ३.३० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल.

✻ गाडी क्र. ०११६० विशेष पंढरपूरहून दि. २५ व २६ जुलै २०२६ रोजी रात्री १०.३० वाजता सुटेल व दुसऱ्या दिवशी दुपारी १.०० वाजता भुसावळ येथे पोहोचेल.

थांबे: जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर, दौंड आणि कुर्डुवाडी.

रचना: १८ सामान्य द्वितीय श्रेणी डबे (२ लगेज-कम-गार्ड ब्रेक व्हॅनसह).

**✻लातूर – पंढरपूर अनारक्षित आषाढी विशेष (८ फेऱ्या)✻**

✻ गाडी क्र. ०११०१ विशेष लातूरहून दि. २४, २७, २८ व २९ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता सुटेल व त्याच दिवशी दुपारी १२.५० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल.

✻ गाडी क्र. ०११०२ विशेष पंढरपूरहून दि. २४, २७, २८ व २९ जुलै २०२६ रोजी दुपारी १.५० वाजता सुटेल व त्याच दिवशी सायंकाळी ७.२० वाजता लातूर येथे पोहोचेल.

थांबे: हरंगुळ, औसा रोड, मुरूड, ढोकी, कळंब रोड, येडशी, धाराशिव, पांगरी, बार्शी टाऊन, शेंद्री, कुर्डुवाडी आणि मोडनिंब.

रचना: ९ शयनयान व ६ सामान्य द्वितीय श्रेणी डबे (२ लगेज-कम-गार्ड ब्रेक व्हॅनसह).

**✻कोल्हापूर – कुर्डुवाडी दैनंदिन अनारक्षित आषाढी विशेष (१६ फेऱ्या)✻**

✻ गाडी क्र. ०१२०९ विशेष दि. २२ ते २९ जुलै २०२६ दरम्यान दररोज सकाळी ६.१० वाजता कोल्हापूरहून सुटेल व दुपारी १.३० वाजता कुर्डुवाडी येथे पोहोचेल.

पंढरपूर आगमन/प्रस्थान: दुपारी १२.१५ / १२.२५

✻ गाडी क्र. ०१२१० विशेष कुर्डुवाडीहून दररोज सायंकाळी ४.३० वाजता सुटेल व रात्री १०.३० वाजता कोल्हापूर येथे पोहोचेल.

पंढरपूर आगमन/प्रस्थान: सायंकाळी ०५.३० / ०५.४०

थांबे: हातकणंगले, जयसिंगपूर, मिरज, अरग, बेलंकी, सलगरे, कवठेमहांकाळ, लंगरपेठ, ढाळगाव, जत रोड, म्हसोबा डोंगरगाव, जवळे, वसूद, सांगोला, पंढरपूर आणि मोडनिंब.

रचना: १४ सामान्य द्वितीय श्रेणी डबे (२ लगेज-कम-गार्ड ब्रेक व्हॅनसह).

**✻पुणे – मिरज दैनंदिन अनारक्षित आषाढी विशेष (१६ फेऱ्या)✻**

✻ गाडी क्र. ०१२०७ विशेष दि. २३ ते २९ जुलै २०२६ दरम्यान दररोज सकाळी ८.४० वाजता पुण्याहून सुटेल व सायंकाळी ६.४५ वाजता मिरज येथे पोहोचेल.

पंढरपूर आगमन/प्रस्थान: ०३.५५ / ०४.००

✻ गाडी क्र. ०१२०८ विशेष मिरजहून दररोज सायंकाळी ७.३० वाजता सुटेल व दुसऱ्या दिवशी पहाटे ४.३० वाजता पुणे येथे पोहोचेल.

पंढरपूर आगमन/प्रस्थान: ०९.५५ / १०.००

थांबे: हडपसर, उरुळी, दौंड, जेऊर, कुर्डुवाडी, मोडनिंब, पंढरपूर, सांगोला, वासूद, जवळे, म्हसोबा डोंगरगाव, जत रोड, ढालगाव, लंगरपेठ, कवठेमहांकाळ, सलगरे, बेलंकी आणि अरग.

रचना: १४ सामान्य द्वितीय श्रेणी डबे (२ लगेज-कम-गार्ड ब्रेक व्हॅनसह).

**✻आरक्षण व तिकीट बुकिंग✻**

विशेष शुल्कासह चालविण्यात येणाऱ्या आषाढी विशेष गाड्यांचे आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच खठउढउ संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

अनारक्षित डब्यांसाठी तिकिटे रेल्वे स्थानकांवरील बुकिंग काउंटर तसेच ठरळश्रजपश ॲपद्वारे उपलब्ध असतील.

प्रवाशांनी वैध तिकिटासह प्रवास करून गैरसोय टाळावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

विशेष गाड्यांच्या सविस्तर वेळापत्रकासाठी www.enquiry.indianrail.gov.in संकेतस्थळास भेट द्यावी किंवा ठरळश्रजपश व NTES ॲप डाउनलोड करावे.

भारतीय रेल्वेच्या वतीने भारताच्या समृद्ध आध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरांचे जतन व संवर्धन करण्यासाठी तसेच सुरक्षित, कार्यक्षम आणि प्रवासी-केंद्रित वाहतूक सेवा पुरविण्याच्या बांधिलकीचा हा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. सोलापूर विभाग पंढरपूर येथे येणाऱ्या सर्व वारकऱ्यांचे मनःपूर्वक स्वागत करीत असून, आषाढी वारी २०२६ चा त्यांचा प्रवास सुरक्षित, सुखकर आणि आध्यात्मिक समाधान देणारा ठरो, अशा शुभेच्छा व्यक्त करीत आहे.

# दिनांक २८ जून २०२६ रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहिम



**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहरामध्ये रविवार दिनांक २८ जून २०२६ रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहिम राबविण्यात येत आहे. या दिवशी ५ वर्षाच्या आतील ४२,८२३ बालकांना पोलिओची लस पाजण्यात येणार आहेत. यासाठी शहरामध्ये एकूण २४० पोलिओ लसीकरण केंदाच्या ठिकाणी लसीकरणाची सोय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यासाठी लातूर महानगरपालिका कार्यालय, एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय येथील अंगणवाडी कर्मचार्यांची, तसेच विवीध खाजगी शाळांच्या शिक्षकांची बुथप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील त्याचप्रमाणे नर्सिंग स्कूल मधील जी.एन.एम. स्टूडंटचा सहभाग घेण्यात येत आहे. तसेच शहराच्या विविध ठिकाणी, शहराच्या बाहेरील भागातील तुरळक वसाहत, बसस्थानक, बसचे थांबे इ. ठिकाणी बुथची व मोबाईल टिमची सोय करण्यात आली आहे.

तरी सर्व पालकांनी आपल्या कुटूंबातील ५ वर्षाच्या आतील बालकास

✻ यापुर्वी किती ही वेळेस पोलिओचा डोस पाजलेला असला तरी,

✻ बाळ आजारी असले तरीही (वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्याने) व

✻ नुकतेच जन्मलेले बाळ असले तरीही आपल्या बालकास पोलिओचे २ थेंब नजीकच्या पोलीओ लसीकरण केंदावरती जाऊन पाजवून घ्यावे व सहकार्य करावे. पल्स पोलीओ लसीकरण मोहिम यशस्वी करावी असे आवाहन लातूर शहर महानगरपालिका, लातूर च्या वतीने करण्यात येत आहे.

**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.**




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# ‘ कास्ट्राईब ’च्या मागण्या मान्य करण्यासाठी निवेदन

- मागण्या मान्य करण्याचे शासनाला साकडे.
- मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमधील आरक्षण तात्काळ रद्द करा.
- जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा सर्व संघटनांचा आग्रह.



**लातूर/प्रतिनिधी:** कर्नाटक राज्याप्रमाणे पदोन्नती मधील मागासवर्गीय आरक्षण तात्काळ लागू करावे. महाराष्ट्रात मागासवर्गीयाच्या पदोनत्यांना अडथळा निर्माण करणारा दि.७ मे, २०२१ चा निर्णय तत्काळ प्रभावासह रद्द करावा, इतर राज्याप्रमाणे जुनी पेंशन योजना लागू करावी, सरळसेवा भरतीमधील मागासवर्गीय अनुशेष तात्काळ भरणे, राज्यात कंत्राटी नोकर भरती धोरण रद्द करावे, वाहन चालक, परिचर,शिपाई पदे कंत्राटी पध्दतीने न भरती सरळसेवा बिंदुनामावली नुसार भरावीत, दिव्यांग विभाग अंतर्गत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू करावा आणि आकृतीबंधानुसार अधिकारी/कर्मचारी यांचे पदे कमी न करता विविध कार्यान्वित योजनांच्या कामांचा आढावा घेऊन पदे वाढवून रिक्त पदे सरळसेवा भरतीद्वारे भरण्यात यावीत,अशा मागण्या शासनाकडे करण्यात आल्या.

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाकडील ज्वलंत मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे राज्य अध्यक्ष कृष्णा इंगळे, कार्याध्यक्ष गणेश मडावी, वरिष्ठ उपाध्यक्ष सुमित भूईगळ यांच्या आदेशानुसार लातूर येथे जिल्हा कास्ट्राईब कर्मचारी महासंघ व महसूल कर्मचाऱ्यांच्या वतीने जिल्हाध्यक्ष नितीन बनसोडे, सरचिटणीस अशोक माळगे, जिल्हा संघटक नागरत्न कांबळे, जिल्हाध्यक्ष महसूल विभाग दत्तात्रय सूर्यवंशी, निलराज बनसोडे अध्यक्ष (जलसंपदा विभाग ) यांनी निवेदन येथील अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती शिल्पा करमरकर मॅडम यांना देण्यात आले.

यावेळी सहाय्यक महसूल अधिकारी विकास अनंतवाड, राहुल बानाटे, कवळीकर शिवकांत,आडे एम. एच,विठ्ठल चव्हाण,अमोल गायकवाड,श्रीमती अनिता हुडे,श्रीमती केंद्रे राजश्री,श्रीमती कवळीकर स्वाती, श्रीमती तांदळे सीमा रवींद्र, श्रीमती सगर अनुराधा, श्रीमती स्वाती ढोणे, श्रीमंत गायकवाड यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

राज्य शासनाकडे वारंवार धरणे आंदोलने करुनही शासनाने दुर्लक्ष केले. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे. मागण्या मान्य न झाल्यास आझाद मैदान, मुंबई येथे तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही निवेदनाद्वारे दिला आहे.

## कर वसुलीसाठी मालमत्ताधारकांना बिले

**लातूर/ प्रतिनिधी:** मालमत्ता कराची वसुली करण्यासाठी मागील तीन महिन्यांपासून महापालिका प्रशासनाने कोणतीही हालचाल केली नव्हती. परंतु, आता तिजोरीतील खडखडाट पाहून महापालिकेच्या कर वसुली विभागाने मालमत्ताधारकांना बिल मागणीच्या नोटिसा काढल्या आहेत. अनेक मालमत्ताधारकांना एसएमएसद्वारेही मोबाईलवर संदेश पाठविण्यात येत आहेत. महापालिका हद्दीतील मालमत्ताधारकांना मालमत्ता व पाणी कर लावते. दरवर्षी साधारणपणे सव्वाशे कोटी रुपयांची कर वसुली अपेक्षित आहे.

परंतु, ५० ते ६० टक्केपर्यंतच कर वसुली होत आहे. अनेक मालमत्ताधारक कर भरण्यास टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येते. महापालिकेची आर्थिक स्थिती सध्या डबघाईस आलेली आहे. कोणतेही शासकीय अनुदान मिळत नाही. यामुळे कर वसुलीशिवाय पर्याय नाही. यासाठी आता पालिकेने मालमत्ताधारकांना वर्षाचा कर भरण्याच्या नोटिसा बजावण्यास सुरुवात केली आहे. या नोटिसीवरच कर भरणा करण्यासाठी क्यूआर कोड देण्यात आला आहे. त्यावर ऑनलाईन पध्दतीने वर्षभराचा कर भरता येणार आहे.

# लातूरचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व श्री. रमेश बियाणी यांना ‘महेश भूषण’ पुरस्कार प्रदान




**लातूर/प्रतिनिधी:** जिल्हा माहेश्वरी सभा, लातूर यांच्या वतीने महेश नवमी उत्सवाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेला भव्य सन्मान सोहळा नुकताच दयानंद सभागृहात अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात लातूरच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय, अभूतपूर्व आणि ऐतिहासिक योगदानाचा गौरव करत दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव आदरणीय श्री. रमेश गोविंदलालजी बियाणी यांना अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठेचा ‘महेश भूषण’ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा सोहळा महाराष्ट्राचे केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे सचिव मा. श्री. अनिलजी नावंदर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आणि लातूर जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष सी.ए. प्रकाश कासट व सचिव राजेश मंत्री, तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या खंबीर नेतृत्वाखाली अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

लातूरच्या एका प्रतिष्ठित व्यापारी कुटुंबात जन्मलेल्या श्री. रमेश बियाणी यांनी सुरुवातीपासूनच समाजकारणाचा ध्यास घेतला. सन २००६ पासून दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव म्हणून धुरा सांभाळत असताना त्यांनी ‘लातूर पॅटर्न’ निर्माण करणाऱ्या या संस्थेच्या सर्वांगीण विकासात आणि उत्तुंग प्रगतीत नेहमीच मार्गदर्शकाची भूमिका बजावली. विद्यार्थ्यांना आधुनिक व व्यावसायिक शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी विविध रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू केले. शिक्षण क्षेत्राला आधुनिकतेची जोड देत त्यांनी वर्गात डिजिटल बोर्ड आणि 'कॉपीमुक्त परीक्षा' धोरणासारख्या अत्याधुनिक संकल्पना यशस्वीपणे राबवल्या. विशेष म्हणजे, महाराष्ट्रात सर्वप्रथम ऑनलाईन शिक्षणाची सुरुवात दयानंद संस्थेत झाली, ज्याची दखल थेट महाराष्ट्र विधानसभेत घेतली जाऊन तत्कालीन मंत्र्यांनी राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये ऑनलाईन शिक्षण सुरू करण्याचे निर्देश दिले होते. भविष्यातील विकसित लातूरची संकल्पना मांडणारा 'लातूर-२०४७' हा त्यांचा दूरदर्शी उपक्रम सादर केला, २०२१ मध्ये सिद्धेश्वर-रत्नेश्वर येथे २५ आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील जोडप्यांचे सामूहिक विवाह देखील त्यांनी यशस्वीपणे लावून दिले. या सोहळ्यात श्री. बियाणी यांच्या याच बहुआयामी आणि समाजोपयोगी कार्याची उदात्त यशोगाथा अत्यंत आदराने आणि कृतज्ञतेने अधोरेखित करण्यात आली.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर उपस्थितांशी संवाद साधताना श्री. रमेश बियाणी यांनी समाजासमोरील आव्हाने, तरुण पिढीची जबाबदारी, आपली संस्कृती आणि भविष्यातील नियोजनावर सविस्तर प्रकाश टाकला. मला आपल्या नवीन युवा पिढीवर प्रचंड विश्वास आहे. आपल्या वाडवडिलांनी दिलेले आणि आपल्या डीएनए मध्ये खोलवर रुजलेले जे संस्कार आहेत, त्या संस्कारांच्या बळावर ही युवा पिढी सद्यस्थितीतील सर्व प्रश्नांचे योग्य उत्तर नक्कीच शोधून काढेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या भाषणात पुढे बोलताना बियाणी यांनी माहेश्वरी समाजाच्या सामाजिक योगदानाचा अत्यंत गौरवपूर्ण इतिहास मांडला. ते म्हणाले की, आम्ही नेहमीच सर्वसमावेशक विचार केला आहे. शिक्षण क्षेत्राचे उदाहरण घेतले, तर 'राजस्थान शिक्षण संस्था' या पवित्र माध्यमाच्या आणि दूरदृष्टीच्या विचारातून अगदी स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजेच १९४७ च्या पूर्वीपासून महिलांना व मुलींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षणाची दारे खुली करण्यात आली. आपली शक्ती फक्त स्वतः चा विचार केल्याने कधीच वाढत नाही, तर ती सर्वांसाठी काम केल्याने आणि सर्व समाजाला सोबत घेऊन पुढे गेल्याने अधिक पटीने वाढते. म्हणूनच या माहेश्वरी समाजाचे लातूरमध्ये एक विशेष आणि आदराचे महत्त्व राहिले आहे.

श्री. रमेश बियाणी यांनी समाजातील वंचित घटकांकडे पाहण्याच्या संवेदनशील दृष्टिकोनावर भाष्य करताना सांगितले की, वंचित, गरीब आणि गरजू लोक हे आपल्यातीलच आहेत. केवळ आर्थिकदृष्ट्या संपन्न असणे म्हणजेच सर्वकाही नाही, तर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रगतीचे साधन पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञान युगाचा वेध घेताना त्यांनी मानवी इच्छाशक्तीची ताकद आणि अध्यात्माची जोड यांची सुरेख सांगड घातली. आज संपूर्ण जग आर्टिफिशियल इंटेलिजन्सबद्दल बोलत आहे आणि अनेक जण मानवी अस्तित्वाची चिंता करत आहेत; परंतु माणसाची अंतर्गत जाणीव आणि प्रबळ इच्छाशक्ती ही कोणत्याही यंत्रापेक्षा श्रेष्ठ असते. ज्या गोष्टी आपण पवित्र भावनेने हाती घेतो, त्यामध्ये एक 'कॉन्शियस इंटेलिजन्स दडलेला असतो आणि हे संपूर्ण ब्रह्मांड देखील आपल्या अंतर्मनाच्या पद्धतीने काम करत असते, असे त्यांनी निक्षून सांगितले.

या सोहळ्याला लातूर जिल्हा माहेश्वरी युवा संघटन, महिला संघटन, लातूर शहर माहेश्वरी सभा, महेश सेना आणि माहेश्वरी समाजाचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी, उद्योगपती, व्यापारी, शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज आणि नागरिक अत्यंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वोच्च आणि मानाच्या ‘महेश भूषण’ पुरस्काराबद्दल श्री. रमेश बियाणी यांच्यावर सध्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अशा सर्वच स्तरांतून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ‘जिज्ञासा’ ग्रंथालयाचे उद्घाटन

## राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलचा १७ वा वर्धापन दिन



**लातूर/प्रतिनिधी:** राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त प्राथमिक विभागासाठी उभारण्यात आलेल्या ‘जिज्ञासा’ या सुसज्ज व आधुनिक ग्रंथालयाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी शाळेच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त संस्था पदाधिकारी, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र, सुसज्ज व आधुनिक ग्रंथालयाची उभारणी ही कौतुकास्पद बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. किंडल आणि डिजिटल माध्यमांच्या युगातही पुस्तकांचे महत्त्व अबाधित असून वाचन संस्कृती जोपासणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रंथालयात मराठी भाषेतील मोठ्या संख्येने पुस्तके उपलब्ध असून मातृभाषेत शिक्षण हा शासनाचा महत्त्वपूर्ण विचार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच शाळेच्या विविध शैक्षणिक व उपक्रमशील कार्याचे त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राणी आमले यांनी केले, तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलु यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. लक्ष्मीरमनजी लाहोटी यांनी भूषविले, तर महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे महासचिव अनिलकुमार नावंदर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. आशिष बाजपेयी, चेअरमन आनंद लाहोटी, कोषाध्यक्ष ईश्वरप्रसाद डागा, विश्वस्त हुकुमचंद कलंत्री, सूर्यप्रकाश धूत, संस्था सचिव लक्ष्मीकांत करवा, संचालक बालकिशन बांगड, चैतन्य भार्गव, शामसुंदर खटोड, निखिल राठी, उपमहापौर ड. स्नेहल उटगे, आशिष सोमानी, प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलु, रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, उपप्राचार्या रिना नायर, माध्यमिक समन्वयक मनोहर कबाडे, अरुल सेल्वी, बी. के. भालेराव तसेच आशिष बनसोडे ,संदीप केंद्रे, मनीषा वराडे, ज्ञानेश्वर यादव, मंगेश रंकाळे, विवेक डोंगरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फाशी.........

मृत्युदंड झाला जारी
फाशी द्या आता तरी
वाट पाहतेयं ती वेदी
न्याय मिळो कधीतरी
बसूनिया रेड्या वरी
कंटाळली यम स्वारी
अशा या नराधमाला
कसेन्यायचे यमद्वारी
होत आहे जीर्ण जुनी
आसूसली फास दोरी
कुजून जाई कालांतरे
निघून जाई शिरजोरी
पुन्हा नवी अडचण
हातावरी दिली तुरी
वाटेनाशी होत आहे
फाशीची भीती सारी
राष्ट्रपती कार्यालयात
माफीनामा अर्जकरी
निसटू पाहे कसातरी
प्रयास चाले परोपरी
कायद्याच्या पळवाटा
अडचण भलती खरी
नरा धम मुक्त फिरतो
निर्भयहोई अत्याचारी
फाशी शिक्षा अवघड
शिक्षा देता कुणा तरी
कारवाई अधिक कटू
फाशी मंजुरी हो जरी

**हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६११६**

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीचे डी.फार्म परीक्षेत दैदिप्यमान यश

**लातूर/प्रतिनिधी:** शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, शिस्त आणि उत्कृष्ट निकालांची भक्कम परंपरा जोपासणाऱ्या दयानंद शिक्षण संस्थेद्वारे संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीने डी.फार्मसी उन्हाळी-२०२६ परीक्षेत पुन्हा एकदा आपल्या शैक्षणिक उत्कृष्टतेचा ठसा उमटविला आहे. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या या परीक्षेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत फार्मसी क्षेत्रातील ‘लातूर पॅटर्न’ची उज्ज्वल परंपरा अधिक दृढ केली आहे.



माहीन मणियार ८८.८२ % | प्रतीक्षा सगर ८७.०० % | नेहा सूर्यवंशी ८५.३६ %



शेख तस्मिया ८७.३०% | कारभारी श्रुती ८६.७०% | कांबळे सायली ८६.२०% | मस्के तनिष्क ८६.२०% | पठाण आर्शिया ८६.२०%

डी.फार्मसी द्वितीय वर्षाच्या परीक्षेत मणियार माहिन हिने ८८.८२ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. सगर प्रतीक्षा हिने ८७.०० टक्के गुणांसह द्वितीय, तर सूर्यवंशी नेहा हिने ८५.३६ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. डी.फार्मसी प्रथम वर्षाच्या परीक्षेत शेख तस्मिया हिने ८७.३० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. कारभारी श्रुती हिने ८६.७० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक पटकावला. तर कांबळे सायली, मस्के तनिष्क आणि पठाण आर्शिया यांनी प्रत्येकी ८६.२० टक्के गुण मिळवत संयुक्तरीत्या तृतीय क्रमांकावर आपले नाव कोरले.

द्वितीय वर्षातून डिस्टिंक्शनमध्ये १९ तर प्रथम श्रेणीत २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रथम वर्षातून डिस्टिंक्शनमध्ये १५ तर प्रथम श्रेणीत ३५ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा प्रथम वर्षाचा निकाल ९४.७३ टक्के, तर द्वितीय वर्षाचा निकाल ९४.६४ टक्के लागला असून हा निकाल संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्थेची आणि विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमांची साक्ष देणारा ठरला आहे.आधुनिक शैक्षणिक सुविधा, अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन, प्रयोगशील अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने राबविण्यात येणारे उपक्रम यामुळे दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीने फार्मसी शिक्षण क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या उल्लेखनीय यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक वैभवात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, सर्व मार्गदर्शक प्राध्यापकवृंद, पालकांचे प्रोत्साहन आणि संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या अभ्यासपूरक वातावरणाला दिले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची जिद्द, चिकाटी व सातत्यपूर्ण मेहनत कारणीभूत असल्याचे त्यांनी सांगितले.

फार्मसी क्षेत्रातही ‘लातूर पॅटर्न’ची यशस्वी परंपरा निर्माण करत विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या नव्या शिखरावर नेल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा, प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, डी.फार्म चे डॉ. प्रकाश शिवनेचारी, डॉ. तनुजा वारद, प्रा. दिपाली स्वामी, प्रा. अंजली साबणे, प्रा. काजल घोडके, प्रा.रागिणी घोटाळे तसेच सर्व प्राध्यापकवृंदांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# मुरुड नगर परिषद स्थापनेच्या मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**धिरज देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मुरुड ग्रामस्थ व काँग्रेस पदाधिकाऱ्यांची मागणी**

**मुरुड/प्रतिनिधी:** : मुरुड ग्रामपंचायतीचे नगर परिषदेमध्ये रूपांतर करण्यात यावे, या मागणीसाठी लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत मुरुड ग्रामस्थ, मुरुड नगरपरिषद संघर्ष समितीचे पदाधिकारी आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनी लातूरचे जिल्हाधिकारी मा. श्री. भारत बास्टेवाड यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. निवेदनात मुरुडची वाढती लोकसंख्या, बिगरशेती व्यवसायाचे वाढते प्रमाण, शासकीय व निमशासकीय कार्यालयांची उपलब्धता, दळणवळणाच्या सुविधा, व्यापारी आस्थापना, विविध बँका तसेच इतर नागरी सुविधांचा उल्लेख करण्यात आला. या सर्व बाबींचा विचार करता मुरुड येथे नगर परिषद स्थापन होणे अत्यावश्यक असल्याचे नमूद करण्यात आले.

या मागणीसाठी धिरज देशमुख यांच्या सूचनेनुसार काँग्रेस पक्षाच्या वतीने मुरुडमध्ये नागरिकांच्या सह्यांचे अभियान राबविण्यात आले होते. मुरुडकरांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन शासनाने नगर परिषद स्थापनेबाबत तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.प्रशासनाकडून माहिती संकलित करताना केवळ २०११ च्या जनगणनेपुरती माहिती मर्यादित न ठेवता अद्ययावत आकडेवारीचा विचार करावा. तसेच मुरुड नगरपरिषद संघर्ष समितीने न्यायालयात सादर केलेली माहितीही ग्राह्य धरावी, अशी मागणी प्रतिनिधीमंडळाने केली.

यावेळी धिरज विलासराव देशमुख यांनी राज्याचे अधिवेशन सुरू असल्याने त्यामध्ये मुरुड नगर परिषद स्थापनेबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी आग्रही भूमिका मांडली. नागरिकांच्या विकासाच्या दृष्टीने मुरुडला नगर परिषदेचा दर्जा मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

## पैशांच्या वादातून तरुणावर हल्ला

**लातूर/प्रतिनिधी:** मागील कामाच्या पैशांच्या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणावर लोखंडी रॉड आणि कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना मौजे पोहरेगाव तांडा येथे घडली. या प्रकरणी पोलिसांनी किशोर व्यंकट राठोड याच्यासह चौघांविरुद्ध रेणापूर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. व्यंकट रावसाहेब पवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, संबंधितांनी संगनमत करून त्यांच्या मुलाला लोखंडी रॉडने आणि कुऱ्हाडीने मारहाण करून गंभीर जखमी केले. तसेच पवार आणि त्यांच्या मुलाला लाठीने मारून जीवे मारण्याची धमकी दिली.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६